cmyk



दैनिक

# राज्य लोकतंत्र



www.epaper.rajyaloktantra.com नवी दिशा... नवे विचार..... email:rajyaloktantra75@gmail.com

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव ● लातुर जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड - महाराष्ट्र | वर्ष-६ | अंक-२०३ | बुधवार दि.१४ ऑक्टोंबर २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/858 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने-६ | किंमत ३ रूपये

नवरात्रोत्सवानिमित्त सर्व भाविक-भक्तांना हार्दिक शुभेच्छा !

## माळ चौथी



चतुर्थीचे दिवशीं विश्वव्यापक जननी हो ।।
उपासकां पाहसी अंबे प्रसन्न अंत:करणीं हो ।।
पूर्णकृपे पाहसी जगन्माते मनमोहिमी हो ।।
भक्तांच्या माउली सुर ते येती लोटांगणीं हो ।। ४ ।।
उदो बोला उदो अंबाबाई माउलीचा हो ।
उदोकारें गर्जती काय महिमा वर्णू तिचा हो ।।

# शेतकऱ्यांच्या मागे कर्जवसुलीचा तगादा लावल्यास खैर नाही!

### मायक्रो फायनान्स, बँका आणि अवैध सावकारांवर कारवाईचे महसूलमंत्री बावनकुळेंचे संकेत; जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा सूचना देणार

नागपूर । प्रतिनिधी

**दुष्काळ, पीक नुकसानी आणि आर्थिक संकटामुळे अडचणीत सापडलेल्या शेतकऱ्यांकडे कर्जवसुलीसाठी तगादा लावणाऱ्या बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि खासगी सावकारांना राज्याचे महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी सज्जड दम दिला आहे. शेतकऱ्यांच्या मागे पैशांसाठी तगादा लावून त्यांना त्रास देण्याचे प्रकार कोणत्याही परिस्थितीत खपवून घेतले जाणार नाहीत. राज्यात बँका, मायक्रो फायनान्स कंपन्या आणि फायनान्स कंपन्यांचा हैदोस चालू देणार नाही, असा स्पष्ट इशारा बावनकुळे यांनी दिला. तसेच, अशा प्रकारांना आळा घालण्यासाठी जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा सूचना देणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले.**

राज्यातील शेतकरी आर्थिक संकटाचा सामना करत असताना कर्जाच्या वसुलीसाठी त्यांच्यावर दबाव आणला जात असल्याच्या तक्रारींच्या पार्श्वभूमीवर बावनकुळे यांनी ही भूमिका मांडली. शेतकऱ्यांना आर्थिक अडचणींचा सामना करावा लागत असताना कर्जवसुलीच्या नावाखाली त्यांचा छळ होऊ नये, यासाठी प्रशासनाने



कठोर भूमिका घेण्याची गरज असल्याचे त्यांच्या वक्तव्यावरून स्पष्ट झाले आहे. मायक्रो फायनान्स कंपन्यांकडून होणाऱ्या कर्जवसुलीच्या पद्धतीवरही महसूलमंत्र्यांनी स्पष्ट भूमिका घेतली. केवळ अवैध सावकारांपुरती कारवाई मर्यादित नसून, नियमबाह्य पद्धतीने कर्जवसुली करून शेतकऱ्यांना त्रास दिला जात असेल, तर संबंधितांविरोधात कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला. मायक्रो फायनान्स कंपन्या असोत, खासगी वित्तपुरवठा करणाऱ्या संस्था असोत किंवा बँका असोत, शेतकऱ्यांच्या मागे वसुलीसाठी तगादा लावण्याचे प्रकार सहन केले जाणार नाहीत, असे त्यांनी बजावले. शेतकऱ्यांच्या कर्जवसुलीच्या प्रकरणांमध्ये जिल्हाधिकाऱ्यांनी आवश्यक ती कारवाई करावी, तसेच संबंधित प्रकरणांमध्ये गुन्हे दाखल करण्याबाबतही सूचना देण्यात आल्याचे ▶▶ पान २ वर

### तक्रारींची पडताळणी करून कारवाई करणार

शेतकऱ्यांना कर्जाच्या परतफेडीसाठी धमकावणे, अनुचित दबाव आणणे किंवा नियमबाह्य पद्धतीने पैसे वसूल करणे असे प्रकार घडत असल्यास प्रशासनाने त्याची गंभीर दखल घेणे अपेक्षित आहे. अशा प्रकारांच्या तक्रारी प्राप्त झाल्यास त्यांची तपासणी करून योग्य ती कारवाई केली जाईल, अशी भूमिका महसूलमंत्र्यांनी मांडली. जिल्हा प्रशासनाने शेतकऱ्यांच्या तक्रारींकडे दुर्लक्ष न करता संबंधित प्रकरणांची पडताळणी करावी आणि कायद्याचे उल्लंघन करणाऱ्यांविरोधात कारवाई करावी, हा या इशाऱ्याचा मुख्य संदेश आहे. जिल्हाधिकाऱ्यांना पुन्हा सूचना देऊन कर्जवसुलीच्या नावाखाली शेतकऱ्यांना त्रास देण्याच्या प्रकारांवर नियंत्रण आणण्याचा प्रयत्न केला जाणार असल्याचे बावनकुळे यांनी सांगितले.

## थोडक्यात...

### राज्यात कचऱ्यापासून बायोगॅस प्रकल्प-मुख्यमंत्री

मुंबई: शहरे कचरामुक्त करण्याच्या प्रयत्नांचा एक भाग म्हणून कचऱ्यापासून कॉम्प्रेस्ड बायोगॅस निर्मितीचे प्रकल्प जलदगतीने राबवण्यासाठी एक टास्क फोर्स (कार्यदल) स्थापन करण्याचे निर्देश राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी मंगळवारी अधिकाऱ्यांना दिले. मुंबईत आयोजित एका बैठकीत प्रस्तावित प्रकल्पांचा आढावा घेताना फडणवीस म्हणाले, राज्याच्या सीबीजी धोरणानुसार योग्य ठिकाणी सीबीजी प्रकल्प उभारले जावेत. प्रकल्पाचे नियोजन करताना निर्माण होणाऱ्या कचऱ्याचे प्रमाण, जमिनीची उपलब्धता, तंत्रज्ञानाची उपयुक्तता आणि गॅस पाइपलाइनपासूनचे अंतर या बाबी विचारात घेतल्या पाहिजेत. या क्षेत्रातील कंपन्या, तेल कंपन्या आणि स्थानिक स्वराज्य संस्थांनी अंमलबजावणीची प्रक्रिया निश्चित करण्यासाठी एकत्रितपणे काम करावे. हे प्रकल्प महानगरपालिकांना कचरा संकलनावरील खर्च कमी करण्यास मदत करतील आणि शहरे कचरामुक्त करण्याच्या प्रयत्नांना बळ देतील, असे मुख्यमंत्र्यांनी सांगितले.

### राहुल गांधीच काँग्रेससाठी सर्वात मोठा धोका-गोयल

दिल्ली: केंद्रीय मंत्री पियुष गोयल आणि लल्लन सिंग अर्थात राजीव रंजन सिंग यांनी नवी दिल्लीत संयुक्त पत्रकार परिषद घेऊन लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर जोरदार हल्ला चढवला. पियुष गोयल यांनी राहुल गांधी यांना काँग्रेससाठी सर्वात मोठा धोका असल्याचे म्हटले. गोयल म्हणाले की, काँग्रेसचे अनेक नेते स्वतःच राहुल गांधींच्या विरोधात बोलत आहेत. गोयल म्हणाले की, काँग्रेस निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्नचिन्ह उपस्थित करते, पण स्वतःच्या कामाकडे आणि कामगिरीकडे पूर्णपणे दुर्लक्ष करते. जर आपण राहुल गांधींची कामगिरी पाहिली तर, एका मुख्य निवडणूक आयुक्तांना पक्षाच्या तिकिटावर उमेदवार बनवण्यात आले, एकाला केंद्रीय मंत्रिमंडळात स्थान देण्यात आले, दोन मुख्य निवडणूक आयुक्तांना राज्यपाल बनवण्यात आले आणि एकदा, जेव्हा मुख्य निवडणूक आयुक्तांनी सांगितले की त्यांच्या हाताखाली काम करणारे एक निवडणूक आयुक्त काँग्रेसचे एजंट म्हणून काम करत आहेत, तेव्हा त्यांनी त्यांना पदावरून हटवण्यास नकार दिला. कोणत्याही सरकारमध्ये असा पक्षपात आम्ही क्वचितच पाहिला आहे.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती,
बीड, दि.१३ ऑक्टोबर २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: १८.५० क्विंटल | २,७०० | ३,१०१ | २,९०० |
| ज्वारी/हायब्रिड: १४४.०० क्विंटल | ३,१०० | ६,६६० | ५,०६७ |
| मका/लोकल: १.०० क्विंटल | २,३०० | २,३०० | २,३०० |
| तूर : १.०० क्विंटल | १०,००० | १०,००० | १०,००० |
| उडीद : १४.०० क्विंटल | ९,६०० | ९,८५१ | ९,७३७ |
| बाजरी: ४६.५० क्विंटल | २,९०० | ३,१३४ | २,९९२ |
| मुग: ३.०० क्विंटल | ९,८०० | १०,००० | ९,९०० |
| सोयाबीन: ३५७.५० क्विंटल | ६,२७० | ७,००० | ६,७३८ |
| हरभरा: ७.५० क्विंटल | ६,७०० | ७,६०० | ७,१३० |

# जंतर-मंतर येथे निदर्शनांवर बंदी घातल्यास देशभर आंदोलने

### दिपकेंचा मोदी सरकारला इशारा, आजपासून आंदोलनात सहभाग



हिंगोली। प्रतिनिधी

**दिल्लीतील जंतर-मंतर येथे निदर्शनांवर बंदी घातल्यास देशभर आंदोलने सुरू होतील, असा इशारा कॉकरोच जनता पार्टीचे संस्थापक अभिजीत दिपके यांनी मंगळवारी दिला. दिपके म्हणाले, दिल्लीला जात असताना पोलिसांनी त्यांना अडवले, तर ज्या ठिकाणी त्यांना ताब्यात घेतले जाईल, तिथूनच ते आंदोलन सुरू करतील.**

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी करणाऱ्या सीजेपीच्या आंदोलनात सहभागी होण्यासाठी आपण बुधवारी राष्ट्रीय राजधानीत पोहोचू, असेही त्यांनी सांगितले. हिंगोली जिल्ह्यात आपल्या मूळ गावी, संतुक पिंपरी येथे ते प्रसारमाध्यमांशी बोलत होते. ११ ऑक्टोबर रोजी जारी केलेल्या एका आदेशात, दिल्लीचे पोलीस आयुक्त अनुराग कुमार यांनी जंतर-मंतरचा अधिकृत आंदोलन स्थळ म्हणून असलेला दर्जा रद्द केला. त्याऐवजी रामलीला मैदान, बुराडी मैदान आणि सीबीडी मैदान ही तीन ठिकाणे मोठ्या निदर्शनांसाठी निश्चित केली. सीजेपीने सांगितले की, त्यांचे नेते सौरव दास आणि आशुतोष रांका यांना पोलिसांनी ताब्यात घेतले. कडक सुरक्षा व्यवस्था आणि बॅरिकेड्स असूनही ते जंतर-मंतरवर पोहोचले होते. मुख्य निवडणूक आयुक्त ▶▶ पान २ वर

# मनोज जरांगेंच्या दसरा मेळाव्याला बीड शिवसेनेचा विरोध !

### एकनाथ शिंदेंच्या विरोधात बोलाल तर खबरदार, स्वप्नील गलधर यांचा इशारा

बीड । प्रतिनिधी

**बीड जिल्ह्यातील नारायण गडावर मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा होणार आहे. हा दसरा मेळावा रद्द करावा, अशी मागणी शिवसेना शिंदे गटाचे बीड जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी केली आहे. त्याचबरोबर मनोज जरांगे पाटील यांना त्यांनी इशारा दिला आहे की, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदेंच्या विरोधात बोलाल तर खबरदार जशास तसे उत्तर दिले जाईल.**

बीड जवळील नगद नारायण गडावर मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी पार पडणार



आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी सुरू असतानाच आता शिवसेना शिंदे गटाने विरोधाची भूमिका घेतली आहे. एकीकडे बीड जिल्हा भीषण दुष्काळाच्या संकटात होरपळत असताना मेळाव्याच्या आयोजनावरून राजकीय वातावरण तापले आहे. शेतकऱ्यांसाठी काही करता आले तर करा, पण मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा नको, अशी भूमिका शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मांडली आहे. दरम्यान, राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या विरोधात बोलाल तर जशास तसे उत्तर दिले जाईल, असा इशारा देखील शिवसेना बीड जिल्हाप्रमुख स्वप्निल गलधर यांनी मराठा आंदोलक मनोज जरांगे यांना दिला आहे. त्यामुळे जरांगे पाटलांच्या मेळाव्याआधीच बीडमध्ये संघर्षाची ठिणगी पडली आहे. आता त्यांच्या या टीकेला जरांगे पाटील नेमके काय प्रत्युत्तर ▶▶ पान २ वर

### एवढा उशीर का?अन कश्यासाठी

आमच्या नेत्या विषयी बोलले तर बीडमध्ये आम्ही कसं स्वागत करतोत, दुष्काळ आहे दसरा मेळावा नको म्हणत आमच्या नेत्या विषयी बोलले तर जशास तसे उत्तर देऊ असे म्हणत थेट जरांगे पाटील यांना देणारे बीडचे शिवसेना एकनाथ शिंदे गटाचे जिल्हाप्रमुख यांनी आता कोणताही विषय नसताना अचानक विरोध करण्याचे कारण काय? जरांगे पाटील तर सध्या कोणत्याच नेत्या विषयी बोललेले नाही ज्यावेळी ते बोलले होते त्यावेळी जालना जिल्हा आणि महाराष्ट्रातील नेत्यांनी जरांगे पाटील यांना विरोध केला त्यावेळी गप्प बसलेले जिल्हाप्रमुख आज अचानक का बोलले? यामागे काही वेगळे कारण आहे का याविषयी आता उलट सुलट चर्चा होत आहे.

# ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी 'इंडिया' आघाडी आक्रमक

### दिल्ली ते गल्ली आंदोलनाचा निर्धार, राहुल गांधींच्या नेतृत्वाखाली लढा तीव्र करणार

नवी दिल्ली । वृत्तसंस्था

देशातील लोकशाही आणि संविधानाच्या रक्षणाचा मुद्दा उपस्थित करत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी 'इंडिया' आघाडीने आपला संघर्ष अधिक तीव्र करण्याचा निर्धार केला आहे. लोकसभा विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्या दिल्लीतील निवासस्थानी झालेल्या बैठकीनंतर विरोधी पक्षांच्या नेत्यांनी पत्रकार परिषद घेऊन केंद्र सरकार आणि निवडणूक आयोगावर जोरदार निशाणा साधला. मुख्य निवडणूक आयुक्तांचा राजीनामा मिळवणे हेच आमचे ध्येय असून, हा संघर्ष वेगवेगळ्या आंदोलनांपुरता मर्यादित नसून एक संयुक्त चळवळ आहे, अशी भूमिका राहुल गांधी यांनी मांडली.



राहुल गांधी यांनी विरोधी पक्षांचे नेते आणि विद्यार्थी संघटनांच्या प्रतिनिधींना चहापान व चर्चेसाठी आपल्या निवासस्थानी आमंत्रित केले होते. या बैठकीत मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार आणि मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेच्या (एसआयआर) विरोधातील आंदोलनाची पुढील दिशा, आंदोलन अधिक व्यापक करण्याची रणनीती आणि विरोधकांच्या एकत्रित भूमिकेबाबत चर्चा झाली. या बैठकीला 'इंडिया' आघाडीतील प्रमुख नेत्यांसह महाराष्ट्रातील काँग्रेसचे खासदारही उपस्थित होते. बैठकीनंतर पत्रकारांशी बोलताना राहुल गांधी यांनी देशातील लोकशाही व्यवस्थेवर हल्ला होत असल्याचा आरोप केला. लोकशाही वाचविण्याचा हा लढा केवळ एखाद्या पक्षाचा किंवा एका राज्यापुरता मर्यादित नसून, विरोधी पक्ष आणि विद्यार्थी संघटनांनी एकत्र येऊन तो पुढे नेण्याची गरज असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याच्या मागणीवर विरोधक ठाम असून, या मागणीसाठी आंदोलन सुरूच राहील, असा निर्धारही त्यांनी व्यक्त केला. एसआयआर प्रक्रियेवरून विरोधकांनी यापूर्वीही निवडणूक आयोगाच्या ▶▶ पान २ वर

# राहुल गांधींनी २०२९ च्या पराभवासाठी तयार राहावे

### एसआयआरच्या नावाखाली घुसखोरांना संरक्षण, अमित शाहांचा हल्लाबोल

दिल्ली ।वृत्तसंस्था

**राहुल गांधी हे एसआयआरच्या नावाखाली घुसखोरांना संरक्षण देत असल्याची टीका केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी केली. राहुल गांधींनी भाजपच्या विजयातून धडा घेण्याचे आणि काँग्रेसला आपल्या पराभवावर आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले. राहुल गांधी आणि त्यांच्या सहकाऱ्यांनाही २०२९ मध्ये मोठ्या पराभवासाठी तयार रहावे असेही शाह म्हणाले.**

गुजरात पालिका निवडणुकीत भाजपच्या प्रभावी कामगिरीनंतर, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी एसआयआरचा संदर्भ देत विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांच्यावर निशाणा साधला.



त्यांनी विचारले की, एसआयआरमुळेच काँग्रेसला गुजरातमध्ये ४१ वर्षे विजय मिळवता आला नाही का? आज संपूर्ण देश पंतप्रधानांसोबत आहे, असे ते म्हणाले. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी राहुल गांधी यांना पुढच्या लोकसभा निवडणुकीत आणखी एका पराभवासाठी तयार राहण्याचे आवाहन केले. राहुल गांधी यांना भाजपच्या विजयातून धडा घेण्याचे आणि काँग्रेसला आपल्या पराभवावर आत्मपरीक्षण करण्याचे आवाहन केले. गृहमंत्री अमित शाह यांनी आरोप केला की, राहुल गांधी घुसखोरांना ▶▶ पान २ वर

### संपूर्ण लडाख आमचा, भारताचा त्यावर बेकायदेशीरपणे कब्जा

# चीनचा दावा, दोन्ही देशांमध्ये पुन्हा तणाव?

दिल्ली । वृत्तसंस्था

**लडाखमधील २८ महत्त्वाच्या ठिकाणांना भारताने अधिकृत नावे दिल्यानंतर चीनने त्याला विरोध केला आहे. काही भागांवरच नव्हे, तर संपूर्ण लडाखवर भारताने 'बेकायदेशीर ताबा' केल्याचा दावा चीनने केला आहे. त्यामुळे भारत आणि चीनमधील सीमा प्रश्नावर पुन्हा तणाव निर्माण होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**





भारताने २ ऑक्टोबर रोजी लडाखमधील २८ महत्त्वाची ठिकाणे आणि भौगोलिक भाग अधिकृतपणे नोंदवले. यामध्ये प्रत्यक्ष नियंत्रण रेषेजवळील गोगरा आणि हॉट स्प्रिंगसारख्या महत्त्वाच्या सीमा भागांचाही समावेश आहे. ही ठिकाणे भारताच्या अधिकृत नकाशात समाविष्ट करण्यात आली आहेत. चीनच्या परराष्ट्र मंत्रालयाच्या प्रवक्त्या माओ निंग यांनी मंगळवारी बीजिंगमध्ये भारताच्या या निर्णयाला विरोध केला. भारताने लडाखला केंद्रशासित प्रदेशाचा दर्जा देण्याचा निर्णय घेतल्यापासून चीनने तो मान्य केलेला नाही, असे त्यांनी सांगितले. लडाखमधील संबंधित भाग चीनचे असल्याचा दावा त्यांनी केला. भारताने ठरवलेली ठिकाणांची नावे 'बेकायदेशीर आणि अमान्य' असल्याचेही चीनने म्हटले आहे. या निर्णयामुळे भारत-चीन सीमेच्या पश्चिम भागातील भूभागाच्या स्थितीत कोणताही बदल होणार नाही, असा दावा चीनने केला. लडाख प्रशासनाच्या सल्ल्याने भारत सरकारने ही २८ ठिकाणे अधिकृतपणे नोंदवली आहेत. अधिकृत नकाशांमध्ये या भागांची ओळख स्पष्ट करणे, त्यांचे अचूक स्थान निश्चित करणे आणि संवेदनशील सीमा भागाबाबत नागरिकांना माहिती देणे हा या निर्णयामागचा उद्देश असल्याचे ▶▶ पान २ वर

# मोदींच्या कॅबिनेटमधील मंत्र्याचा राजीनामा



दिल्ली । वृत्तसंस्था

केंद्र सरकारमधील माहिती आणि प्रसारण तसेच संसदीय कार्य राज्यमंत्री एल. मुरुगन यांनी आपल्या मंत्रिपदाचा आणि राज्यसभा खासदारकीचा तडकाफडकी राजीनामा दिला आहे. तमिळनाडूत आगामी काळात भाजपची संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी आणि २०२९ च्या लोकसभा निवडणुकीच्या पूर्वतयारीसाठी त्यांनी थेट लोकांमध्ये उतरून काम करण्याचा ▶▶ पान २ वर

cmyk

## अग्रलेख

# लोकशाहीचा संकोच आणि जंतर-मंतरची नाकेबंदी प्रस्तावना आणि पार्श्वभूमी

भारतीय लोकशाहीच्या इतिहासात नवी दिल्लीतील 'जंतर-मंतर' या परिसराला केवळ एक भौगोलिक स्थान म्हणून नव्हे, तर सर्वसामान्यांच्या जनआक्रोशाचे, अभिव्यक्ती स्वातंत्र्याचे आणि असहमतीचे एक जिवंत प्रतीक म्हणून ओळखले जाते. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला आणि विविध शोषित घटकांनी सरकारचे लक्ष वेधण्यासाठी या रस्त्याचा वापर अनेक दशकांपासून केला आहे. मात्र, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्र सरकारच्या कार्यकाळात कायदा आणि सुव्यवस्थेचे कारण पुढे करत ज्या पद्धतीने जंतर-मंतरवरील आंदोलनांवर निर्बंध लादले गेले आणि आंदोलनाचे अधिकृत ठिकाण शहराबाहेर हलवण्यात आले, ते लोकशाही मूल्यांच्या संकोचाचे एक गंभीर लक्षण मानले जात आहे.

लोकशाहीत शांततापूर्ण निदर्शने करणे, मोर्चे काढणे आणि सरकारच्या धोरणांचा विरोध करणे हा नागरिकांचा राज्यघटनेने दिलेला मूलभूत अधिकार आहे. जंतर-मंतरवरून आंदोलकांना हटवून त्यांना रामलीला मैदान किंवा बुराडीसारख्या दूरच्या मैदानांवर पाठवण्याचा प्रशासकीय निर्णय हा निव्वळ व्यवस्थापनाचा भाग वाटत नाही. हे सत्ताधाऱ्यांना जनतेच्या रोषापासून दूर ठेवण्याचे आणि आंदोलकांचा आवाज दाबण्याचे एक पद्धतशीर धोरण आहे. संसदेच्या आणि सत्तेच्या केंद्राजवळ आंदोलने झाली, तरच त्याचा दबाव सरकारवर निर्माण होतो. आंदोलकांना शहराच्या वेशीवर किंवा बंदिस्त मैदानांमध्ये ढकलून देणे म्हणजे लोकशाहीतील 'विरोधाच्या अधिकाराचे' अप्रत्यक्षपणे अवमूल्यन करणे होय. मोदी सरकारच्या काळात केवळ आंदोलनांच्या जागाच बदलल्या नाहीत, तर संपूर्ण देशाची कायदेशीर चौकट बदलताना अ-लोकशाही मार्गांचा अवलंब केल्याचे दिसून आले आहे. संसदेत व्यापक चर्चा न करता, विरोधी पक्षांच्या खासदारांना मोठ्या संख्येने निलंबित करून नवीन फौजदारी कायदे (भारतीय न्याय संहिता) आणि इतर कठोर नियम संमत करून घेण्याची घाई सरकारने दाखवली. यामुळे नागरिकांच्या नागरी हक्कांचे रक्षण करणाऱ्या संस्था कमजोर होत आहेत. जंतर-मंतरवरून आंदोलनाचे हक्क हिरावून घेतानाही स्थानिक प्रशासन आणि दिल्ली पोलिसांच्या माध्यमातून जनतेवर आणि विरोधी पक्षांवर थेट दडपशाही केली गेली. 'इंडिया' आघाडीच्या आंदोलनाला ज्या प्रकारे रोखण्यात आले आणि नेत्यांना ताब्यात घेण्यात आले, त्यावरून सरकार असहमतीचा प्रत्येक आवाज चिरडण्यास उत्सुक असल्याचे दिसून येते. जंतर-मंतरवरील आंदोलनांवर आलेली गदा ही केंद्र सरकारच्या वाढत्या केंद्रीकरणाच्या वृत्तीशी सुसंगत आहे. देशातील निवडणूक रोखे कायदा असो, ज्याला सर्वोच्च न्यायालयाने असंवैधानिक ठरवले, किंवा राज्यांचे अधिकार मर्यादित करणारे इतर प्रशासकीय नियम असोत, प्रत्येक ठिकाणी लोकशाहीतील 'चेक्स अँड बॅलन्सेस' (तपासणी आणि संतुलन) मोडीत काढण्याचा प्रयत्न झाला आहे. जेव्हा देशातील प्रमुख लोकशाही संस्था, संसद आणि नागरिकांचे हक्क एकाच केंद्राकडून नियंत्रित केले जातात, तेव्हा लोकशाहीचे रूपांतर हुकूमशाहीत होण्याचा धोका वाढतो. जंतर-मंतरवरील निर्बंध हे याच मानसिकतेचे दृश्य स्वरूप आहे.

कोणतेही कायदे, नियम किंवा प्रशासकीय बदल हे जनतेला शिस्त लावण्यासाठी नसून त्यांच्या हक्कांचे रक्षण करण्यासाठी आणि लोकशाही मजबूत करण्यासाठी असावेत. प्रशासकीय सोयीच्या नावाखाली जर जनतेचा आंदोलनाचा अधिकारच हिरावून घेतला, तर लोकशाही केवळ नावालाच उरेल. जंतर-मंतर हे लोकशाहीचे फुफ्फुस होते, जिथे सामान्य माणूस मोकळा श्वास घेऊन सरकारविरुद्ध बोलू शकत होता. या जागेची नाकेबंदी करणे म्हणजे लोकशाहीच्या गळ्याला नख लावण्यासारखे आहे. जर भारताला जगातील सर्वात मोठी आणि सशक्त लोकशाही म्हणून टिकून राहायचे असेल, तर सरकारने बहुमताच्या जोरावर नागरिकांचे मूलभूत हक्क आणि आंदोलनांचे स्वातंत्र्य हिरावून घेणे थांबवले पाहिजे. जनतेचा आवाज दाबणारे कायदे सुशासन आणू शकत नाहीत, तर ते केवळ असंतोष वाढवण्यास कारणीभूत ठरतात.

# निसर्गाचा अनमोल ठेवा आता एकाच पुस्तिकेत!

## परळी कृषी विभागाकडून ८५ 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' माहिती पुस्तिका प्रकाशित

बीड । प्रतिनिधी

रानभाजी महोत्सवाचे औचित्य साधून तालुका कृषी अधिकारी कार्यालय, परळी वैजनाथ यांच्या वतीने 'आरोग्यदायी रानभाज्यांची ओळख' ही अत्यंत महत्त्वपूर्ण आणि माहितीपूर्ण पुस्तिका तयार करण्यात आली आहे. तालुका कृषी अधिकारी डॉ. अर्चना पद्मिनी शंकरराव नागरगोजे यांच्या संकल्पनेतून आणि संपादनाखाली ही पुस्तिका प्रकाशित करण्यात आली असून, याद्वारे निसर्गाच्या कुशीत दडलेला रानमेवा जनसामान्यांपर्यंत पोहोचवण्याचा स्तुत्य प्रयत्न करण्यात आला आहे.

बदलत्या आणि वेगवान जीवनशैलीमुळे आपण नैसर्गिक आणि पौष्टिक आहारापासून दुरावत चाललो आहोत, या पार्श्वभूमीवर ही पुस्तिका सर्वांसाठी एक उत्तम मार्गदर्शक ठरणार आहे. या पुस्तिकेमध्ये महाराष्ट्र राज्याच्या विविध भागात आढळणाऱ्या एकूण ८५ रानभाज्यांची सविस्तर माहिती संकलित करण्यात आली आहे. यामध्ये प्रामुख्याने पालेभाज्या, कंदमुळे, पाण्यातील वनस्पती, वेलवर्गीय भाज्या, झुडपे, वृक्ष आणि बुरशीजन्य भाज्यांचा समावेश आहे. या प्रत्येक रानभाजीचा आढळ कुठे होतो, तिचे आरोग्याच्या दृष्टीने आहारातील महत्त्व काय आहे, तिचे औषधी गुणधर्म कोणते आहेत आणि ती चविष्ट पद्धतीने शिजवण्याची पाककला काय आहे, याची इत्थंभूत माहिती या पुस्तिकेत देण्यात आली आहे. सध्याच्या काळात भाजीपाल्याच्या उत्पादनात रासायनिक खतांचा आणि कीटकनाशकांचा अतिवापर होत असल्याने आरोग्याला गंभीर धोका निर्माण झाला आहे. मात्र, रानभाज्या या रानावनात पूर्णपणे नैसर्गिकरीत्या येत असल्याने त्या विषमुक्त, सेंद्रिय आणि औषधी गुणधर्मांनी परिपूर्ण असतात. ग्रामीण भागातील शेतकरी तसेच शहरी भागातील नागरिकांनी या रासायनिक फवारणीमुक्त रानभाज्यांची अचूक ओळख पटवून त्यांचा आपल्या रोजच्या आहारात आवर्जून समावेश करावा, या मुख्य उद्देशाने या पीडीएफ पुस्तिकेची निर्मिती करण्यात आली आहे. यामुळे शहरी ग्राहकांना उत्तम व पौष्टिक आहार मिळेल, तर दुसरीकडे रानावनातून या भाज्या गोळा करून बाजारात विकणाऱ्या ग्रामीण आणि आदिवासी कष्टकरी बांधवांना रोजगाराची व उत्पन्नाची नवी संधी उपलब्ध होऊन मोठा आर्थिक हातभार लागेल. परळी कृषी विभागाच्या या अभिनव आणि काळाची गरज असलेल्या उपक्रमाचे सर्वच स्तरातून भरभरून कौतुक होत आहे. राज्याच्या मंत्री पंकजा गोपीनाथ मुंडे, बीडचे खासदार बजरंग मनोहर सोनवणे, परळीचे आमदार धनंजय मुंडे आणि बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी या पुस्तिकेच्या निर्मितीबद्दल तालुका कृषी अधिकारी व त्यांच्या संपूर्ण टीमचे विशेष अभिनंदन केले असून उपक्रमास लेखी शुभेच्छा दिल्या आहेत. सर्वसामान्य नागरिकांनी, शेतकरी बांधवांनी आणि विशेषतः तरुण पिढीने या पीडीएफ पुस्तिकेचा जास्तीत जास्त लाभ घेऊन आपल्या व आपल्या कुटुंबाच्या सुदृढ आरोग्यासाठी रानभाज्यांचा आहारात नियमित वापर करावा, असे आवाहन कृषी विभागाकडून करण्यात आले आहे.

# सौताडा शाळेची राष्ट्रीय नाट्य स्पर्धेसाठी राज्यस्तरावर निवड

विशाल साळुंके । बीड

पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील माध्यमिक शाळेचा मंगळवारी संभाजीनगर येथे झालेल्या विभागीय स्पर्धेत दुसरा क्रमांक आला विभाग स्तरावर आलेल्या पहिल्या आणि दुसऱ्या क्रमांकासाठी नाट्यमहोत्सव स्पर्धेच्या राज्यस्तरीय स्पर्धेसाठी सौताडा शाळेची निवड करण्यात आली. . विशेष म्हणजे या शाळेला जिल्हा शिक्षण विभागाकडून या स्पर्धेची कसलीही माहिती देण्यात आली नव्हती. बाहेरून माहिती मिळाल्यानंतर हे विद्यार्थी स्पर्धेला पोहोचले.



पाटोदा तालुक्यातील सौताडा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेचा राष्ट्रीय नाट्य महोत्सव स्पर्धेमध्ये जिल्हास्तरावर प्रथम क्रमांक आला होता. ही शाळा विभागीय स्तरावरील स्पर्धेसाठी पात्र ठरली. विभागीय स्तरावरील स्पर्धा मंगळवारी संभाजीनगर येथे पार पडली. मात्र या स्पर्धे संदर्भात बीड जिल्हा शिक्षण विभागाकडून शाळेला कसलीही माहिती देण्यात आली नाही. मुख्याध्यापकांना बाहेरून माहिती मिळाल्यानंतर ते या स्पर्धेसाठी विद्यार्थ्यांना घेऊन रवाना झाले. मात्र तोपर्यंत उशीर झाला होता. तरीही आ.सुरेश धस यांच्या विनंती मुळे या स्पर्धेमध्ये या शाळेला संधी मिळाली ही शाळा वेळेवर पोहोचली असती तर विभाग स्तरावर प्रथम क्रमांक आला असता अशी खंत ग्रामस्थांनी व्यक्त केली . विभाग स्तरावर दुसरा क्रमांक आल्यानंतरही या शाळेला राज्यस्तरावर संधी मिळाल्याने शाळेचे मुख्याध्यापक गणेश बेद्रे सर, शिक्षक चौरे यांच्यासह सर्व शिक्षक आणि विद्यार्थ्यांचे सौताडा ग्रामस्थांमधून अभिनंदन होत आहे. ही शाळा राज्यस्तरावरही प्रथम क्रमांक पटकावेल असा विश्वास पालक प्रदीप जाधव यांनी व्यक्त केला.

### शिक्षण विभागाचा गलथानपणा

बीड जिल्ह्यामध्ये प्रथम आलेल्या सौताडा माध्यमिक शाळेला नाट्यमहोत्सव स्पर्धेच्या विभागीय स्तरावरील निवडीसाठी मंगळवारी स्पर्धा असल्याचे माध्यमिक शिक्षण विभागाकडून सांगण्यात आले नाही. हा शिक्षण विभागाचा गलथानपणा असून शिक्षकांना याची माहिती मिळाली नसती तर ही शाळा स्पर्धेतून बाद झाली असती. मात्र वेळेवर माहिती मिळाल्याने शिक्षक आणि विद्यार्थी विभागीय स्पर्धेसाठी पोहचू शकले.

### आ.धस यांच्या प्रयत्नाला यश

गावातील पालक प्रदीप काका जाधव यांनी याबाबत आष्टी - पाटोदा चे आमदार सुरेश धस यांना याची कल्पना दिल्यानंतर त्यांनी संभाजीनगर येथील विभागीय स्तरावर बोलून विद्यार्थ्यांना संधी द्या अशी विनंती केली. त्यामुळे सौताडा शाळेच्या विद्यार्थ्यांना संधी मिळाली आणि आज राज्य स्तरावर स्पर्धेसाठी हे विद्यार्थी पात्र झाले. आमदार सुरेश धस यांनी या शाळेला केलेल्या मदतीबद्दल ग्रामस्थांनी त्यांचे आभार मानले आहेत.

# तळागाळातील विद्यार्थ्यांना घडवा; गुणवत्तेच्या बळावर जागतिक स्तरावर चमकण्याची संधी निर्माण करा-जयदत्त क्षीरसागर

## कालिकादेवी महाविद्यालयात कै.केशरबाई क्षीरसागर स्मृतिदालनाचे उद्‌घाटन

शिरूर कासार । प्रतिनिधी

**शिक्षणाच्या माध्यमातून तळागाळातील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास झाला पाहिजे. आजच्या स्पर्धात्मक युगात गुणवत्तेला जागतिक स्तरावर अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. विद्यार्थ्यांना केवळ पुस्तकी ज्ञान देऊन चालणार नाही, तर संशोधन, सांस्कृतिक क्षेत्र आणि क्रीडा क्षेत्रातही त्यांना प्रावीण्य मिळविण्यासाठी सक्षम करणे आवश्यक आहे, असे प्रतिपादन जयदत्त क्षीरसागर यांनी केले.**

शिरूर कासार येथील कालिकादेवी कला, वाणिज्य व विज्ञान महाविद्यालयात माजी खासदार कै. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्या स्मृतिप्रीत्यर्थ उभारण्यात आलेल्या स्मृतिदालनाचे उद्घाटन जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते करण्यात आले. याप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी सभापती सुधाकर मिसाळ, माजी सभापती सतीश काटे, माजी सभापती बाबुराव केदार, माजी जिल्हा परिषद सदस्य सुभाष क्षीरसागर , शरद ढाकणे,पाडळी चे सरपंच गहिनीनाथ पाखरे, सुलेमान पठाण, गोविंद पाटील गाडेकर, मानूर चे सरपंच पठाण,आजिनाथ गवळी, महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ विश्वास कंधारे, प्राचार्य केशव भांगे यांची प्रमुख उपस्थिती होती. पुढे बोलताना क्षीरसागर म्हणाले की, आपल्या काळात शैक्षणिक वातावरण आजच्या तुलनेत फारसे प्रभावी आणि परिणामकारक नव्हते. मात्र, अलीकडच्या काळात शिक्षण, संशोधन आणि तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात प्रचंड वेगाने बदल होत आहेत. या बदलत्या परिस्थितीत विद्यार्थ्यांनी स्वतःला अद्ययावत ठेवून ज्ञान, कौशल्य आणि गुणवत्तेच्या बळावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण केली पाहिजे. संधी निर्माण करण्याची ताकद गुणवत्तेत असते. केवळ इतरांच्या आधारावर प्रगती करता येत नाही; स्वतःच्या क्षमतेवर उभे राहण्याची वृत्ती विद्यार्थ्यांमध्ये विकसित झाली पाहिजे. आरक्षणाच्या



भूमिकेबाबत आपली भूमिका स्पष्ट करताना ते म्हणाले की, आपण आरक्षणाचे पुरस्कर्ते आहोत. शासनाने निर्माण केलेल्या विकासाच्या संधी समाजातील शेवटच्या घटकापर्यंत पोहोचल्या पाहिजेत. तळागाळातील विद्यार्थ्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणून त्यांना प्रगतीच्या समान संधी उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. आज कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख), रोबोटिक्स आणि आधुनिक तंत्रज्ञानामुळे शिक्षण क्षेत्रासमोर नवी आव्हाने निर्माण झाली आहेत. या बदलांकडे केवळ आव्हान म्हणून न पाहता त्यांचा योग्य वापर करून विद्यार्थ्यांची ज्ञानक्षमता आणि संशोधनवृत्ती विकसित केली पाहिजे. देशाच्या प्रगतीत पारंपरिक १०+२+३+२ शैक्षणिक रचनेचे योगदान महत्त्वाचे राहिले आहे. त्याचबरोबर नवीन शैक्षणिक धोरणातून होत असलेले बदलही भावी पिढीच्या विकासासाठी महत्त्वपूर्ण ठरू शकतात. या परिवर्तनातून देशाच्या शैक्षणिक भविष्याला नवी दिशा मिळेल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी शिक्षकांनीही अद्ययावत राहणे गरजेचे विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी केवळ अभ्यासक्रम पूर्ण करणे पुरेसे नाही. विद्यार्थ्यांमधील सुप्त गुण ओळखून त्यांना विविध क्षेत्रांत स्वतःला सिद्ध करण्याची संधी दिली पाहिजे. महाविद्यालयातील शिक्षक आणि प्राध्यापक चांगले काम करीत असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले. मात्र, बदलत्या काळानुसार शिक्षकांनी सातत्याने अद्ययावत राहून विद्यार्थ्यांना आधुनिक ज्ञान आणि कौशल्यांचे मार्गदर्शन केले, तर याच महाविद्यालयातील विद्यार्थी राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावर चमकतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. विद्यार्थ्यांनी आपल्या गुणवत्तेच्या जोरावर महाविद्यालयाचा नावलौकिक वाढवावा, यासाठी सर्वांनी कसोशीने प्रयत्न करावेत, असे आवाहनही त्यांनी केले. याप्रसंगी सांस्कृतिक विभाग तसेच 'आविष्कार' संशोधन उपक्रमांतर्गत विविध स्तरांवर प्रावीण्य मिळविलेल्या विद्यार्थ्यांचा जयदत्त क्षीरसागर यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या यशाचे कौतुक करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा देण्यात आल्या.कै. केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर यांच्या स्मृतिदालनाच्या उद्घाटनामुळे महाविद्यालयाच्या शैक्षणिक आणि सांस्कृतिक वाटचालीतील एका महत्त्वपूर्ण पर्वाची नोंद झाली. या उपक्रमातून विद्यार्थ्यांना प्रेरणा मिळावी आणि शिक्षणासोबतच सामाजिक जाणीव, संशोधनवृत्ती व गुणवत्तेची कास धरण्याची प्रेरणा मिळावी, अशी भावना यावेळी व्यक्त करण्यात आली.

# पान १ वरून...

### शेतकऱ्यांच्या मागे कर्जवसुलीचा

बावनकुळे यांनी सांगितले. बँका किंवा वित्तीय संस्थांकडून नियमबाह्य वसुली होत असल्याचे आढळल्यास संबंधितांवर कारवाई करण्याची भूमिका सरकारने घेतल्याचे त्यांनी स्पष्ट केले. अवैध सावकारीविरोधातही जिल्हाधिकाऱ्यांना कारवाईच्या सूचना देण्यात आल्या आहेत. मात्र, या सूचनांनंतरही शेतकऱ्यांकडून बेकायदेशीर किंवा नियमबाह्य पद्धतीने कर्जवसुली केली जात असेल, तर त्याची दखल घेऊन कारवाई करण्यात येईल, असेही त्यांनी स्पष्ट केले.

----------

### मनोज जरांगेंच्या दसरा

देणार हे पाहणे देखील महत्वाचे ठरणार आहे. मराठा आंदोलक मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलनात राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यावर प्रखर टीका केली होती. एकनाथ शिंदे यांनी समजाला धोका दिला असल्याचा गंभीर आरोप मनोज जरांगे पाटील यांनी केला. तसेच त्यांच्यावरील विश्वास उरला नसल्याची टीका मनोज जरांगे पाटील यांनी मराठा आंदोलनाच्या वेळी केली होती. या पार्श्वभूमीवर शिवसेना शिंदे गटाच्या नेत्यांनी मनोज जरांगे पाटील यांच्यावर जोरदार टीका केली होती. विरोधात बोलाल तर जशास तसे उत्तर देऊ, अशी आक्रमक भूमिका शिंदेसेनेने घेतली होती. दुसरीकडे स्थानिक पातळीवरही शिंदेसेनेचे कार्यकर्ते जरांगे पाटील यांनी विरोध करीत आहेत. बीडच्या श्रीक्षेत्र नगद नारायण गडावर मनोज जरांगे पाटील यांचा दसरा मेळावा २० ऑक्टोबर रोजी पार पडणार आहे. या मेळाव्याची जय्यत तयारी सुरू असतानाच आता शिवसेना शिंदे गटाने विरोधाची भूमिका घेतली आहे.

--------------

### जंतर-मंतर येथे निदर्शनांवर

ज्ञानेश कुमार राजीनामा देत नाहीत तोपर्यंत त्यांचे आंदोलन सुरूच राहील, असे दिपके यांनी सांगितले. जंतर-मंतर हा आंदोलनांचा आत्मा असल्याचे सांगत त्यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांच्यावर लोकशाही मार्गाने व्यक्त होणारा विरोध दडपल्याचा आरोप केला. ते कुठे आंदोलन करतील असे विचारले असता, संपूर्ण राष्ट्र जंतर-मंतर बनेल आणि दिल्लीही जंतर-मंतर बनेल, असे दिपके म्हणाले.

----------

### राहुल गांधींनी २०२९ च्या

संरक्षण देण्यासाठी एसआयआरचा बहाणा म्हणून वापर करत आहेत. गुजरातमध्ये तीन नगरपालिका आणि महानगरपालिकांसाठी निवडणुका झाल्या. या दोन नगरपालिका आणि एका महानगरपालिकेतील १०४ जागांपैकी ९० जागा जिंकून भारतीय जनता पक्षाने दणदणीत विजय मिळवला. माझ्या मतदारसंघात येणाऱ्या गांधीनगर महानगरपालिकेत भाजपने ४४ पैकी ३८ जागा जिंकल्या. आम आदमी पक्षाने सर्व ३२ जागा लढवल्या, परंतु प्रत्येक जागेवर त्यांची अनामत रक्कम जप्त झाली. गुजरातमधील हा दणदणीत विजय राज्यातील मतदारांचा मूड दर्शवतो आणि हे सिद्ध करतो की गुजरातची जनता नरेंद्र मोदींसोबत खंबीरपणे उभी आहे. मला राहुल गांधींना हेही विचारायचे आहे की, हा एसआयआरचा परिणाम आहे का? तुम्ही भाजपची लोकप्रियता आणि पंतप्रधान मोदी यांना एसआयआरचे कारण म्हणून फेटाळून लावता. तुम्हाला आत्मपरीक्षण करण्याची गरज आहे. एका मोठ्या राज्यात, जिथे एकेकाळी तुमची सत्ता होती, तिथे तुम्ही ४१ वर्षांत एकही निवडणूक जिंकलेली नाही. ही एक अशी बाब आहे ज्यावर त्यांनी गांभीर्याने आत्मपरीक्षण केले पाहिजे.नुकत्याच पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पुदुचेरी या तीन राज्यांमध्ये पोटनिवडणुका पार पडल्या. आज मला देशातील जनतेला हे कळवायचे आहे की, पश्चिम बंगाल, तामिळनाडू आणि पुदुचेरीमध्ये झालेल्या निवडणुकांमध्ये काँग्रेस पक्षाला एकही जागा जिंकता आली नाही.

--------------

### ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्यासाठी

कार्यपद्धतीवर प्रश्न उपस्थित केले आहेत. आता या मुद्द्यावर सर्व विरोधी पक्षांना एकत्र आणून आंदोलनाची व्याप्ती वाढविण्याचा प्रयत्न केला जात आहे. बैठकीनंतरच्या पत्रकार परिषदेतून विरोधकांनी आपापल्या पक्षांच्या स्वतंत्र भूमिकांपलीकडे जाऊन संयुक्त लढ्याचा संदेश देण्याचा प्रयत्न केला. राष्ट्रीय जनता दलाचे नेते तेजस्वी यादव यांनीही आंदोलन रोखण्याच्या प्रयत्नांवरून सरकारला लक्ष्य केले. जंतरमंतरवर आंदोलन करण्यास परवानगी नाकारून मैदानाबाहेर आंदोलन करण्यास सांगितले जात असेल, तर त्यातून सरकारची भीती दिसून येते, अशी टीका त्यांनी केली. विरोधकांचे आंदोलन सुरूच राहील आणि सरकारला या प्रश्नांची उत्तरे द्यावी लागतील, असा इशाराही त्यांनी दिला. राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या (शरदचंद्र पवार) खासदार सुप्रिया सुळे यांनीही 'इंडिया' आघाडीच्या आंदोलनाला पाठिंबा दर्शविला. देशाचे संविधान धोक्यात असल्याची भूमिका मांडत त्यांनी लोकांचे अधिकार मिळवून देण्यासाठी विरोधक एकत्रितपणे लढत राहतील, असे सांगितले. राष्ट्रवादी काँग्रेस (शरदचंद्र पवार) पक्ष आणि ठाकरेसेना हे दोन्ही पक्ष 'इंडिया' आघाडीसोबत ठामपणे उभे राहतील, असेही त्यांनी स्पष्ट केले. मुख्य निवडणूक आयुक्तांविरोधातील आंदोलनाला आता देशव्यापी स्वरूप देण्याचा विरोधकांचा प्रयत्न आहे. राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली दिल्लीपासून देशातील विविध भागांपर्यंत आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका विरोधी पक्षांनी मांडली आहे. त्यामुळे एसआयआर प्रक्रिया, निवडणूक आयोगाची कार्यपद्धती आणि मुख्य निवडणूक आयुक्तांच्या राजीनाम्याची मागणी यांवरून केंद्र सरकार व विरोधकांमधील संघर्ष आणखी तीव्र होण्याची चिन्हे आहेत.

**संजय राऊतांचा 'माफिया' म्हणत हल्लाबोल**

ठाकरेसेनेचे खासदार संजय राऊत यांनी मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्यावर अत्यंत आक्रमक शब्दांत टीका केली. ज्ञानेश कुमार हे 'माफिया' असल्याचा आरोप करत त्यांनी व्यवस्थेचे गुन्हेगारीकरण झाल्याचा दावा केला. या संघर्षाला राहुल गांधी यांच्या नेतृत्वाखाली पुढे नेण्यात येईल, असेही राऊत यांनी स्पष्ट केले. मोदी आणि शाह घाबरून बसले असून, दिल्लीच्या रस्त्यांवर सशस्त्र सुरक्षा दल तैनात करण्यात आल्याचा आरोपही राऊत यांनी केला. मात्र, अशा परिस्थितीतही आंदोलन थांबणार नसल्याचे सांगत त्यांनी दिल्लीसह देशातील विविध राज्यांमध्ये हा लढा सुरू ठेवण्याचा निर्धार व्यक्त केला.

-----------

### मोदींच्या कॅबिनेटमधील

निर्णय घेतला आहे. राजीनाम्याची घोषणा करताना एल. मुरुगन यांनी सोशल मीडियावर भावुक पोस्ट लिहीत पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचे आभार मानले. एका रोजंदारी मजुराच्या मुलापासून ते पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील केंद्रीय मंत्रिमंडळात काम करण्यापर्यंतचा प्रवास हा माझ्या आयुष्यातील सर्वात मोठा बहुमान राहिला आहे. आता मला तमिळनाडूतील कार्यकर्त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहायचे आहे. २०२९ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी तमिळनाडूत भाजपला तळागाळात मजबूत करण्यासाठी मी स्वतःला पूर्णपणे झोकून देणार आहे. राष्ट्र प्रथम, नंतर पक्ष आणि सर्वात शेवटी स्वतः, असं एल मुरुगन यांनी त्यांच्या पोस्टमध्ये म्हटलं आहे. एल. मुरुगन २०२१ मध्ये पहिल्यांदा राज्यसभेवर निवडून आले होते, तर २०२४ मध्ये ते दुसऱ्यांदा राज्यसभा खासदार बनले. माहिती व प्रसारण, संसदीय कार्य आणि डेअरी मंत्रालयाची धुरा सांभाळणाऱ्या मुरुगन यांच्या राजीनाम्यामुळे राज्यसभेतील तमिळनाडूची एक जागा रिक्त झाली आहे. मुरुगन यांच्या या निर्णयामुळे तमिळनाडूत भाजपच्या प्रदेश नेतृत्वात आणि संघटनात्मक रचनेत मोठे फेरबदल होण्याचे संकेत राजकीय वर्तुळात दिले जात आहेत.

--------------

### चीनचा दावा, दोन्ही

सांगण्यात आले आहे. भारताने नोंदवलेल्या ठिकाणांमध्ये गोगरा आणि हॉट स्प्रिंग या भागांचाही समावेश आहे. २०२० मध्ये भारत आणि चीनच्या सैनिकांमध्ये पूर्व लडाखमध्ये तणाव निर्माण झाला होता. त्यावेळी हे भाग महत्त्वाचे ठरले होते. पूर्व लडाखमध्ये ५ मे २०२० रोजी पँगोंग सरोवर परिसरात भारतीय आणि चिनी सैनिकांमध्ये हिंसक झटापट झाल्यानंतर सीमा तणाव वाढला होता. त्यानंतर दोन्ही देशांमध्ये चर्चा सुरू झाली आणि २०२२ पासून काही भागांतून सैनिक मागे घेण्याची प्रक्रिया सुरू झाली होती. भारताने नोंदवलेल्या ठिकाणांमध्ये अलीशा गिरि पर्वत चोटी, ब्रांगसा, चापचिंगल दर्रा, कनिष्क चोटी, करुण पीर पर्वत, कुकसेल, मार्तंड गिरि, पारपिक हिमनद, स्कामरी हिमनद, शचमिरिक दर्रा, शकोरगा घाटी, जोरावर चोटी, देहरा कंपास आणि द्रक कारपो यांचा समावेश आहे. याशिवाय जलमोरी, कुमारायण पॉइंट, पांगलुंग, रिनचेन जांगपो, साक्यश्री गिरि, गुरु रिनपोछे, शामल लुंगपा, यांगपा नदी, मारपा लोत्सावा री, मिलारेपा कांगरी, शिव री आणि महेश्वर री या ठिकाणांचाही यादीत समावेश आहे.

------------

# गैरव्यवहारांची सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी गुन्हे दाखल करा-पांडुरंग आवारे-पाटील

बीड । प्रतिनिधी

दि. १२ ऑक्टोबर २०२६ रोजी मानेवाडी.ता.जि.बीड येथील पांडुरंग आवारे-पाटील व समस्त ग्रामस्थांच्या वतीने खालीलप्रमाणे वस्तुस्थिति आपल्या निर्दशनास आणून देत आहोत मौजे मानेवाडी येथे सन २०२१ पासून आजतागायत सरपंच सौ. सोनाली प्रदीप माने यांच्या अधिकृत उपस्थितीत रीतसर नोटीस काढून कोणतीही ग्रामसभा झालेली नाही. झालेल्या कथित ग्रामसभा सरपंच यांचे पती प्रदीप अंकुश माने यांच्या उपस्थितीत जवळच्या चार आठ लोकांना सोबत घेऊन गावकऱ्यांना अंधारात ठेवून केवळ कागदोपत्रीच दाखवण्यात आल्या आहेत. तसेच, गावात कोट्यवधी रुपयांची विविध शासकीय विकासकामे केवळ कागदावर बोगस दाखवून अथवा जे काही प्रमाणात कामे झाली आहेत ते अत्यंत निकृष्ट दर्जाची करून शासनाचा लाखों रूपयांचा निधी हडप करण्यात आला आहे. सरपंच सौ. सोनाली प्रदीप माने, त्यांचे पती प्रदीप अंकुश माने, ग्रामसेवक बाळासाहेब तंबरे, रोजगार सेवक युवराज माने यांनी संगनमत करून मोठ्या प्रमाणावर भ्रष्टाचार केला आहे.

समाज कल्याण दलित वस्ती निधीचा अपहार: समाज कल्याण विभागामार्फत मंजूर झालेल्या सुमारे ३० लाख रुपयांच्या निधीतून जुन्याच अस्तित्वात असलेल्या शासकीय डांबरी रस्त्यावर बोगस काम दाखवून शासकीय निधी लाटण्यात आला आहे. मनरेगा () पांदन रस्ते कामांत गैरव्यवहार व बोगस बँक खाती: सन २०२४ मध्ये मंजूर ५ पांदन रस्ते खडीकरण कामांत मजुरांऐवजी ट्रॅक्टर व जेसीबीचा वापर करून कामे उरकण्यात आली. शिक्षण किंवा रोजगारासाठी मुंबई-पुणे येथे राहणाऱ्या ग्रामस्थांच्या परस्पर 'फिनो बँके'त बनावट खाती उघडून त्यांच्या नावावर लाखो रुपयांचा निधी उचलण्यात आला आहे. (उदा. मानेवाडी ते मवाईशे वस्ती रस्ता कामाचा निकृष्ट दर्जा उघड करणारे फोटो व व्हिडिओ दि. ११/०७/२०२६ रोजी व्हॉट्सअ‍ॅपवर प्रसारित होताच, दि. १२/०७/२०२६ रोजी रातोरात यंत्रांच्या साह्याने थातूरमातूर काम पूर्ण करण्यात आले. अशाच प्रकारे 'दत्तात्रय नवनाथ माने ते रजमीचा ओढा' आणि 'मानेवाडी ते रमेश अंगद माने' या रस्त्यांची कामेही निकृष्ट व बोगस पद्धतीने करण्यात आली आहेत.) प्रधानमंत्री आवास योजना (घरकुल) लाभार्थी खंडणी: मंजूर १४३ घरकुल लाभार्थ्यांपैकी बहुतांश लाभार्थ्यांकडून प्रत्येकी ₹१९,००० ते ₹३०,००० आणि एका लाभार्थ्याकडून तब्बल ₹४९,००० पर्यंत लाच उकळण्यात आली आहे.सरपंच, ग्रामसेवक, रोजगार सेवक, संबंधित इंजिनिअर व बीडीओ यांच्या साटेलोट्यामुळे गरिबांची लूट झाली असून, लाभार्थ्यांचे उर्वरित हप्ते जाणीवपूर्वक रोखण्यात आले आहेत. ४. १५ वा वित्त आयोग निधी गैरव्यवहार: १५ व्या वित्त आयोगांतर्गत गावात झालेली कामे अत्यंत निकृष्ट दर्जाची असून केवळ बिले उचलण्याचा उद्देश ठेवून कागदोपत्री दाखवली गेली आहेत. राजर्षी शाहू महाराज सार्वजनिक वाचनालय घोटाळा: गावात वाचनालयासाठी सुसज्ज इमारत उपलब्ध असतानाही ते गेल्या अनेक वर्षांपासून कुलूपबंद आहे. वाचनालयाच्या नावावर शासनाकडून मंजूर झालेला लाखो रुपयांचा निधी हडप करण्यात आला आहे.




राष्ट्रीय पेयजल योजना अपहार व बेकायदेशीर वसुली: सन २०१३ मध्ये ४४ लाखांची पेजल योजना आणि त्यानंतर वाढीव अंदाजपत्रकात ( ) मंजूर ४३ लाख रुपये, अशा सुमारे ८७ लाख रुपयांच्या योजनेत अत्यंत निकृष्ट दर्जाची पाईपलाईन टाकण्यात आली आहे. अध्याप ही त्या योजनेचे पाणी पिण्यास ग्रामस्थांना मिळेत नाही व नळ जोडणीसाठी कनेक्शन दिले म्हणून ग्रामस्थांकडून बेकायदेशीरपणे प्रति कुटुंब ₹१,५०० च्या वर बोगस पावत्या फाडून सक्तीने वसुली करण्यात आली आहे. ग्रामपंचायत भवन जागा गैरव्यवहार: सन २०१८ मध्ये मंजूर झालेले ग्रामपंचायत भवन ग्रामस्थांना विश्वासात न घेता सोयीस्करपणे गावाबाहेर बांधण्यात आले. अपूर्ण अंगणवाडी बांधकाम: सन २०१२ मध्ये मंजूर झालेल्या अंगणवाडी इमारतीचा निधी उचलूनही आजतागायत काम अपूर्ण अवस्थेत पडून आहे. जि. प. प्राथमिक शाळा निकृष्ट बांधकाम: सन २०२०-२१ मध्ये मंजूर झालेले प्राथमिक शाळेचे बांधकाम अत्यंत निकृष्ट दर्जाचे झाले असून, ही इमारत कधीही कोसळून लहान मुले व शिक्षकांचा जीव जाण्याची गंभीर भीती निर्माण झाली आहे. १०)मानेवाडी.ता.जि.बीड येथे गायगोटे ५२ मंजूर असून प्रतेकी १७/१८००० रूपये घेहुन सुद्धा पहीला हाफता सोडता उर्वरित रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यात जमा नाही केली तरी त्याची ही सखोल चौकशी करून ती रक्कम शेतकऱ्याच्या खात्यात जमा करावी हि नम्र विनंती. ११)लाडकी बहीण योजनेचे प्रतेक लाभार्थी महिलेला १५०० रूपये व पी एम किसान योजनेचे २००० हजार रुपये आणि मुख्यमंत्री नमो शेतकरी योजनेचे प्रतेक शेतकरी लाभार्थ्यांना २००० हजार रुपये शासनाचे मिळत असुन असून आनेक लाभार्थ्यांचे फिनो बँकेचे अकाऊंट काढून आनेकांचे पैसे सरपंच व अन्य सहकारी संगनमत करून ते पैसै उचलत आहेत त्या वरील योजनेतील आनेक गौर गरीब लाभार्थ्यांचे बॅक पासबुक व एटीएम कार्ड हे सरपंचाचे पती प्रदीप अंकुश माने व रोजगार सेवक युवराज मधुकर माने यांच्याकडे आज तागयत त्यांच्या ताब्यात आहेत म्हणून त्याची विषेश बाब म्हणून सखोल चौकशी करून संबंधितांवर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत व सर्व शेतकऱ्यांना व लाडक्या भहीणींना न्याय द्यावा हि नम्र विनंती. मौजे मानेवाडी येथे वरिष्ठ प्रशासकीय अधिकाऱ्यांच्या उपस्थितीत तत्काळ विशेष ग्रामसभा आयोजित करण्यात यावी. उपरोक्त सर्व कामांचे मोजमाप, तांत्रिक ऑडिट आणि आर्थिक फॉरेन्सिक ऑडिट त्रयस्थ गुणवत्ता नियंत्रकाकडून / समितीमार्फत करून दोषींवर भारतीय न्याय संहितेनुसार तत्काळ फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल करावेत. वरील सर्व प्रकरणांची निष्पक्ष चौकशी करून मानेवाडी ग्रामस्थांना न्याय द्यावा, ही नम्र विनंती मानेवाडी ग्रामस्थ व राष्ट्रवादीकाँग्रेस अजितदादा पवार पक्षाचे, ग्रा प सदस्य पांडुरंग आवारे-पाटील व अन्य ग्रामस्थांनी सह्या करून बीडचे उपजिल्हाधिकारी () मा स्वामी साहेब, जिल्हा परिषद मुख्य कार्यकारी अधिकारी, तहसीलदार शेळके साहेब यांना प्रतेक्ष भेटुन निवेदन दिले आहे. आणि वरील सर्व कामांची ३० दिवसांच्या आत सखोल चौकशी करून कारवाई न केल्यास न विलाजाने पांडुरंग आवारे-पाटील यांनी ३० दिवसानंतर आत्मधन करेल असे देखील निवेदनात नमूद केले आहे व ह्याला जबाबदार या वरील विषय संमदीत आपण सर्वजण असाल असा देखील उल्लेख पांडुरंग आवारेंनी केला आहे. प्रत माहिती व योग्य त्या कार्यवाहीसाठी सस्नेह अग्रेषि मा मुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई.,मा उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री महोदय, बीड/पुणे.,मा. उपमुख्यमंत्री महोदय, महाराष्ट्र राज्य, मंत्रालय, मुंबई., मा मुख्य कार्यकारी अधिकारी (), जिल्हा परिषद, बीड. यांचा उल्लेख निवेदनात करण्यात आला आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
बुधवार दि. १४ ऑक्टोबर २०२६





## धानोरा बु. सोसायटीच्या चेअरमनपदी मदन पाटील यांची बिनविरोध निवड

अंबाजोगाई । प्रतिनिधी

अंबाजोगाई तालुक्यातील धानोरा बु. येथील सेवा सहकारी सोसायटीच्या चेअरमनपदी मदन किशनराव पाटील यांची बिनविरोध निवड झाली आहे. त्यांच्या या निवडीबद्दल परिसरातून त्यांचे अभिनंदन करण्यात येत असून, त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.

सेवा सहकारी सोसायटी ही ग्रामीण भागातील शेतकऱ्यांसाठी महत्त्वाची संस्था असून, शेतकऱ्यांना विविध सेवा आणि सहकार्य उपलब्ध करून देण्यात तिची महत्त्वपूर्ण भूमिका असते. या पार्श्वभूमीवर नवनिर्वाचित चेअरमन मदन किशनराव पाटील यांच्या नेतृत्वाखाली सोसायटीची प्रगती होईल, तसेच शेतकरी बांधवांच्या हितासाठी विविध उपक्रम राबविले जातील, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी समजून घेऊन त्यांना सहकार्य करणे, सोसायटीच्या कामकाजात पारदर्शकता राखणे आणि संस्थेच्या विकासाला प्राधान्य देणे, या माध्यमातून सोसायटीची विश्वासार्हता अधिक बळकट होईल, अशी भावना व्यक्त होत आहे

## महाराष्ट्राच्या लोककलेतील दिमाखदार पर्वाची अखेर –उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार

मुंबई :– मराठी चित्रपट, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रात आपल्या समर्थ अभिनयाने आणि बहारदार लावणीने स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या ज्येष्ठ अभिनेत्री मधू कांबीकर यांच्या निधनाने महाराष्ट्राच्या लोककलेतील एक दिमाखदार पर्व संपले आहे, अशा शब्दांत उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी त्यांना श्रद्धांजली अर्पण केली.

उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार आपल्या शोकसंदेशात म्हणतात, मधू कांबीकर यांनी महाराष्ट्राच्या मातीत रुजलेल्या लोककलेचा अस्सल बाज आयुष्यभर जपला. लोककलेच्या व्यासपीठावर सुरू झालेला त्यांचा प्रवास मराठी नाटक आणि चित्रपटसृष्टीपर्यंत पोहोचला. आपल्या सहजसुंदर अभिनयाने, वैशिष्ट्यपूर्ण नृत्यशैलीने आणि लावणीच्या प्रभावी सादरीकरणाने त्यांनी रसिकांच्या मनावर अनेक दशके अधिराज्य गाजवले.

बीड जिल्ह्यातील गेवराई तालुक्यातील मालेगाव येथे जन्मलेल्या मधू कांबीकर यांना बालपणापासूनच लोककलेचा समृद्ध वारसा लाभला. अत्यंत लहान वयात रंगमंचावर पाऊल ठेवत त्यांनी आपल्या कलेच्या बळावर स्वतंत्र स्थान निर्माण केले. लावणी आणि तमाशासारख्या महाराष्ट्राच्या पारंपरिक लोककलांना व्यापक प्रतिष्ठा मिळवून देण्यात त्यांचे महत्त्वपूर्ण योगदान राहिले. चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी ७५ हून अधिक चित्रपटांसह अनेक नाटकांमधून आपल्या वैविध्यपूर्ण अभिनयाची छाप उमटवली.ग्रामीण महाराष्ट्रातील लोककलेच्या व्यासपीठापासून चित्रपटसृष्टीपर्यंतचा त्यांचा प्रवास हा जिद्द, संघर्ष आणि कलेवरील निष्ठेचा प्रेरणादायी प्रवास होता. आपल्या कलेच्या माध्यमातून त्यांनी महाराष्ट्राची लोकसंस्कृती आणि लावणीची परंपरा समृद्ध केली. त्यांचे कलाक्षेत्रातील योगदान आणि त्यांनी साकारलेल्या भूमिका रसिकांच्या स्मरणात कायम राहतील. मधू कांबीकर यांच्या निधनाने मराठी चित्रपट, नाट्य आणि लोककलेच्या क्षेत्रातील एक ज्येष्ठ, प्रतिभावंत आणि अस्सल कलावंत हरपला आहे. त्यांच्या कुटुंबीयांच्या आणि असंख्य चाहत्यांच्या दुःखात मी सहभागी आहे. मधू कांबीकर यांना भावपूर्ण श्रद्धांजली, अशी भावना उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांनी व्यक्त केली.

# 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजने'ची तिसरी यादी जाहीर

# चौथीही यादी येणार ; ४५ हजार शेतकऱ्यांचा समावेश

बीड । प्रतिनिधी

जिल्ह्यात पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६ अंतर्गत थकीत पीक कर्ज असलेल्या ४५,०१५ शेतकऱ्यांची तिसरी यादी १२ ऑक्टोबर २०२६ रोजी महाराष्ट्र शासनाने प्रसिद्ध केली आहे. या योजनेच्या पहिल्या यादीत ९६,५२३ आणि दुसऱ्या यादीत ५७,७३२ शेतकऱ्यांचा समावेश करण्यात आला होता. आतापर्यंत राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेचे थकीत पीक कर्ज असलेल्या एकूण १,९९,२७० शेतकऱ्यांची यादी शासनाने प्रसिद्ध केली असून, या याद्या संबंधित ग्रामपंचायत, सेवा सहकारी संस्था आणि बँकांच्या शाखांमध्ये पाहण्यासाठी उपलब्ध करण्यात आल्या आहेत. १३ ऑक्टोबर २०२६ पर्यंत या यादीतील १,२९,०४९ शेतकऱ्यांनी आधार केंद्रावर जाऊन आपले आधार प्रमाणीकरण यशस्वीरित्या पूर्ण केले आहे.

### शेतकऱ्यांच्या खात्यावर ९१८ कोटी रुपये जमा; कर्जमाफीचे निकष स्पष्ट

बीड जिल्ह्यातील 'पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना २०२६' अंतर्गत प्रसिद्ध करण्यात आलेल्या तिन्ही याद्यांमधील लाभार्थ्यांची संख्या खालीलप्रमाणे आहे: ✻ पहिल्या यादीतील शेतकरी: ९६,५२३ ✻ दुसऱ्या यादीतील शेतकरी: ५७,७३२ ✻ तिसऱ्या यादीतील शेतकरी: ४५,०१५ ✻ आतापर्यंत प्रसिद्ध झालेली एकूण लाभार्थी संख्या: १,९९,२७० शेतकरी (राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक व बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक एकत्रित). यापैकी आतापर्यंत १,२९,०४९ शेतकऱ्यांनी आधार प्रमाणीकरण पूर्ण केले असून, उर्वरित ७०,२२१ शेतकऱ्यांचे प्रमाणीकरण बाकी आहे.

पहिली आणि दुसरी यादी प्रसिद्ध झाल्यानंतर शेतकऱ्यांनी केलेल्या प्रमाणीकरणानुसार, शासनाने बीड जिल्ह्यासाठी एकूण ९१८.५६ कोटी रुपये मंजूर केले आहेत. यापैकी राष्ट्रीयकृत व महाराष्ट्र ग्रामीण बँकेच्या १,०४,६२४ थकीत कर्जदारांच्या खात्यात ८८५.०७ कोटी रुपये, तर बीड जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या ६,२५४ कर्जदारांच्या खात्यात ३३.४९ कोटी रुपये थेट जमा करण्यात आले आहेत. या योजनेअंतर्गत १ एप्रिल २०१९ ते ३१ मार्च २०२५ या काळात वाटप झालेले, ३० सप्टेंबर २०२५ रोजी थकबाकी असलेले आणि ३१ मार्च २०२६ रोजी कर्जबाकी असलेले दोन लाख रुपयांपर्यंतचे संपूर्ण पीक कर्ज माफ करण्यात आले आहे. तसेच, राष्ट्रीयकृत व व्यापारी बँकांमधील काही शेतकऱ्यांची ३१ मार्च २०२६ रोजीची थकबाकी दोन लाखांपेक्षा जास्त असली तरी, शासनाच्या हेअर कट धोरणानुसार ही कर्जे निरंक केली जाणार आहेत. योजनेतील मयत झालेले, वयस्कर किंवा बोटांचे ठसे उमटत नसलेल्या शेतकऱ्यांसाठी शासनाने १९ ऑगस्ट २०२६ रोजी स्वतंत्र मानक कार्यप्रणाली (डजझ) देखील निर्गमित केली आहे.

शासनाने प्रसिद्ध केलेली ही तिसरी यादी अंतिम नसून, पहिल्या तीन याद्यांमध्ये ज्यांची नावे नाहीत त्यांची नावे पुढील यादीत येऊ शकतात. या याद्यांमध्ये नाव असलेल्या सर्व शेतकऱ्यांनी स्वतःचे आधार कार्ड आणि बँक पासबुक सोबत नेऊन 'आपले सरकार सेवा केंद्रावर' विनाशुल्क आधार प्रमाणीकरण (ए-घधउ) करून घेणे बंधनकारक आहे. हे प्रमाणीकरण झाल्यानंतरच कर्जमुक्तीची रक्कम शेतकऱ्यांच्या खात्यावर जमा केली जाणार आहे. तसेच, ज्या शेतकऱ्यांच्या खात्यावर कर्जमुक्तीची रक्कम जमा झाली आहे, त्यांना त्वरित नवीन पीक कर्ज वाटप करण्याच्या स्पष्ट सूचना बीड जिल्ह्यातील सर्व राष्ट्रीयकृत बँका, महाराष्ट्र ग्रामीण बँक आणि बीड जिल्हा मध्यवर्ती बँकेला देण्यात आल्या आहेत. त्यामुळे अद्याप आधार प्रमाणीकरण शिल्लक असलेल्या उर्वरित ७०,२२१ शेतकऱ्यांनी तात्काळ आपले प्रमाणीकरण पूर्ण करावे, असे महत्त्वपूर्ण आवाहन बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्हा उपनिबंधक सतिश तोटावार यांनी केले आहे.

# उध्दव ठाकरे यांच्या उपस्थितीत परिषदेचा पुरस्कार वितरण सोहळा

### येत्या शनिवारी मुंबईत; सर्वांनी उपस्थित राहावे - मुख्य विश्वस्त एस.एस.देशमुख यांचे आवाहन

मुंबई । प्रतिनिधी

अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेच्यावतीने देण्यात येणाऱ्या विविध पुरस्कारांचे वितरण शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी यशवंतराव चव्हाण सेंटर येथे शिवसेना पक्षप्रमुख श्री.उध्दव ठाकरे यांच्या हस्ते करण्यात येणार असल्याची माहिती अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख यांनी एका प्रसिद्धी पत्रकाद्वारे दिली आहे.. जेष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्काराने सन्मानित करण्यात येणार आहे..



पत्रकारांची मातृसंस्था असलेल्या अखिल भारतीय मराठी परिषदेच्यावतीने दरवर्षी पत्रकारितेत भरीव योगदान देणाऱ्या पत्रकारांचा विविध पुरस्कार देऊन दरवर्षी सन्मान केला जातो..

यावर्षी बाळशास्त्री जांभेकर जीवनगौरव पुरस्कार ज्येष्ठ पत्रकार हेमंत देसाई यांना जाहीर झाला आहे. २५ हजार रूपये रोख, मानपत्र, स्मृतीचिन्ह असे या पुरस्कारांचे स्वरूप आहे.

त्याच बरोबर यावर्षीचे आचार्य अत्रे स्मृती पुरस्कार– ज्येष्ठ पत्रकार प्रशांत कदम,सावित्रीबाई फुले पत्रकारिता पुरस्कार – जान्हवी मुळे,हिंदी पत्रकारितेचे भीष्माचार्य बाबुराव पराडकर पुरस्कार – अनुराग त्रिपाठी,विशेष मान्यवरांच्या रकमेतील पुरस्कार दत्ताजीराव तटकरे स्मृती पत्रकारिता सचिन परब (इटीव्हीचे मुंबई ब्यूरो चीफ),स्वातंत्र्यसेनानी मनोहरपंत चिवटे आरोग्य पत्रकारिता पुरस्कार – संतोष आंधळे,माणिकराव देशमुखे देवडीकर कृषी पत्रकारिता –सुनील पाटील (कोल्हापूर सकाळ),भगवंतराव इंगळे स्मृती पत्रकारिता अविनाश महालक्ष्से (नागपूर), नागोजीराव उर्फ आण्णासाहेब दुधगावकर स्मृती – अभय देशपांडे, प्रमोद भागवत स्मृती शोध पत्रकारिता –महेश तिवारी (न्यूज १८ लोकमत, गडचिरोली),संतोष पवार स्मृती पत्रकारिता – बापूसाहेब जाधव (सातारा, ग्रामोद्धार) यांना जाहीर करण्यात आला आहे. सदरचा कार्यक्रम हा शनिवार दिनांक १७ ऑक्टोबर २०२६, सायं. ६.०० वाजता

यशवंतराव चव्हाण सेंटर, मुंबई या ठिकाणी होत आहे. दिनांक १७ ऑक्टोबर २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता होणाऱ्या या पुरस्कार वितरण सोहळ्यास सर्वांनी मोठया संख्येने उपस्थित राहावं असे आवाहन अखिल भारतीय मराठी पत्रकार परिषदेचे मुख्य विश्वस्त श्री.एस.एम.देशमुख, अध्यक्ष शिवराज काटकर, विशस्त शरद पावळे, किरण नाईक, मुंबई शाखेचे अध्यक्ष राजा आचाटे, मुंबई अधिस्वीकृती समितीचे अध्यक्ष दीपक कैतके, डिजिटल मिडिया परिषदेचे अनिल वाघमारे, माजी अध्यक्ष मिलिंद अष्टीवकर, सुरेश नाईकवाडे, मन्सुरभाई शेख, शोभा जयपुरकर आर्दिनी केले आहे.

## पान ६ वरुन...

### पोलिसांच्या दडपशाहीच्या

पोलिसांचा निर्णय मागे घेत नाहीत तोपर्यंत यात्रा बंद राहील असा निर्णय घेण्यात आला. यासंदर्भात पालकमंत्री सुनेत्राताई पवार ,बीडचे खासदार बजरंग सोनवणे, आमदार संदीप क्षीरसागर, जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन ,पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनाही कळवण्यात आले.हा सर्व प्रकार दुपारपर्यंत चालू होता. त्यानंतर मात्र अप्पर जिल्हाधिकाऱ्यांनी ठोस आश्वासन दिल्यानंतर यापुढे यात्रेत कसलाही अडथळा निर्माण होणार नाही याची ग्वाही दिल्यानंतर यात्रा सुरळीत करण्यात आली.

### कर्जमाफीच्या तिसऱ्या यादीत आष्टी

तसेच आवश्यक प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी शासनाच्या अधिकृत पोर्टलचा वापर करता येईल. अधिकृत संकेतस्थळ : https://agristack.gov.in//mh तसेच F-RMER REGISTRY MH या पच्या माध्यमातूनही संबंधित प्रक्रिया करता येऊ शकते. लॉगिन करताना अडचण येत असल्यास "Forgot Password' हा पर्याय वापरून पुढील प्रक्रिया पूर्ण करावी. त्यानंतर आवश्यक माहिती अद्ययावत झाली आहे का, याची खात्री करून घ्यावी.

### गर्दीत चोरी गेलेली दीड

तपासातून आरोपी निष्पन्न करून चोरीला गेलेली सोनसाखळी मिळवण्यात पोलिसांना यश आले. सोनसाखळी मिळाल्याचा निरोप मिळाल्यानंतर सुरुवातीला विश्वासच बसत नव्हता. मात्र, प्रत्यक्ष सोनसाखळी पाहिल्यानंतर आप्पा मोहिते यांच्यासह ग्रामस्थांचा आनंद द्विगुणित झाला. कायदेशीर प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर सोनसाखळी रामभाऊ मोहिते यांच्याकडे सुपूर्द करण्यात आली.

पोलिसांवरील विश्वास ठरला सार्थ

एखादी वस्तू चोरीला गेल्यानंतर ती पुन्हा मिळणार नाही, असे समजून अनेकजण तक्रार करण्याचे टाळतात. मात्र, तक्रार नोंदवून पोलिसांना आवश्यक माहिती, फोटो आणि व्हिडिओ उपलब्ध करून दिल्यास तपासाला महत्त्वाची मदत होऊ शकते, हे या घटनेतून स्पष्ट झाले. बीड ग्रामीण पोलिसांनी दाखवलेली तत्परता, कर्तव्यनिष्ठा आणि नागरिकांच्या विश्वासाला दिलेला न्याय कौतुकास्पद आहे. पोलीस हवालदार प्रसाद कदम आणि त्यांच्या सहकाऱ्यांच्या प्रयत्नांमुळे चोरीला गेलेली सोनसाखळी परत मिळाल्याची प्रतिक्रिया फिर्यादी मोहिते यांनी दिली.

### श्रमदान व वृक्षसंवर्धनातुन

विभागणी करून सर्वांनी एकजुटीने श्रमदान केले.यामध्ये ८८ पुरुष,३८ महिला,६ ऑफिस स्टाफ आणि २४ फिल्ड स्टाफ असे १५६ सहभागी झाले. या उपक्रमास अतुल आंधळे मा.संतोष शिनगारे मराठवाडा समन्वयक,पाणी फाउंडेशन महादेव जायभाये,महिला व बालकल्याण प्रकल्प विकास अधिकारी ता.कृषी अधिकारी बाबर,कृषी मंडळ अधिकारी; फिरोज देशमुख,तलाठी; विनोद ठोंबर टेक्निकल ट्रेनर पाणी फाउंडेशन;.पवार मंडळ कृषी अधिकारी; रामेश्वर पवळ, कृषी सहाय्यक अधिकारी; बडे मॅडम, कृषी सहायक अधिकारी काकडहिरा;अविनाश तावरे, मुंबई पोलीस,तसेच सरपंच संजय जायभाये,उपसरपंच सोमीनाथ जायभाये,मा.सरपंच विनोद जायभाये,विष्णू जायभाये,विशाल घोलप,पाणी फाउंडेशन समन्वयक, गावकरी,शेतकरी,वॉटरशेड टीम मेंबर्स आणि उमेद अभियानातील महिला बचत गट सदस्य मोठ्या संख्येने उपस्थित होते सर्वांनी एकत्रितपणे ३० मिनिटे श्रमदान करून ८० रनिंग मीटर चराचे काम पूर्ण केले. यामधून ८.८ घनमीटर मातीचे काम झाले असून, हा चर एकदा पाण्याने भरल्यास तब्बल ८,८०० लिटर पाणी साठवण क्षमता निर्माण झाली आहे.श्रमदानानंतर उपस्थितांनी हर्मन बाखर बाबा यांच्या विचारांचे श्रवण केले.त्यानंतर आदरांजली अर्पण करून अल्पोपहाराने कार्यक्रम संपन्न झाला.

### आ. धस यांची नानाचीवाडी

आणि हिंदी चित्रपटसृष्टीत वेगळी ओळख निर्माण केली होती. चित्रपटांमधील विविधांगी भूमिका, परखड विचार आणि सामाजिक कार्याच्या माध्यमातून त्यांनी समाजमनावर आपली छाप उमटवली. विशेषतः सामाजिक बांधिलकी जपत त्यांनी केलेले कार्य सदैव स्मरणात राहील. नाना पाटेकर यांच्या निधनामुळे कलाविश्वासह सामाजिक क्षेत्राचीही मोठी हानी झाली असून, त्यांच्या कलात्मक आणि सामाजिक योगदानाच्या आठवणी कायम जिवंत राहतील. या दुःखद प्रसंगी आ. सुरेश धस यांनी पाटेकर कुटुंबीयांच्या दुःखात सहभागी होत त्यांना धीर दिला.

------------

## ग्रामविकास मंत्री जयकुमार गोरे यांचा वाढदिवस शेतकऱ्यांच्या अडचणी सोडवून साजरा करणार– ॲड. शिंदे

बीड । प्रतिनिधी

यावर्षी राज्यातील दुष्काळी परिस्थिती लक्षात घेता, शेतकर्यांच्या विविध अडचणी तसेच जनावरांसाठी चारा व पाण्याची उपलब्धता यांसारख्या समस्यांचा विचार करून, त्यांचा वाढदिवस सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून साजरा करण्याचा निर्णय महात्मा फुले युवा दलाच्या वतीने घेण्यात आला आहे.



वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च करण्याऐवजी समाजातील गरजू घटकांना मदत करणे, शेतकर्यांना दिलासा देणे आणि सामाजिक बांधिलकी जपणे, हा या उपक्रमांचा मुख्य उद्देश आहे. या माध्यमातून सेवाभाव जपत समाजोपयोगी कार्य करण्याचा संकल्प महात्मा फुले युवा दलाने केला आहे.

महात्मा फुले युवा दलाच्या वतीने

बुधवार, दि. १४ ऑक्टोबर रोजी गोवर्धन गोशाळा रामगड येथे चारा वाटप,गुरुवार, दि. १५ ऑक्टोबर रोजी इन्फंट इंडिया आनंदग्राम पाली येथे अनाथ मुलांना भोजन,जिल्हा परिषद शाळा खोपटी येथे शैक्षणिक साहित्याचे वाटप ,शुक्रवार, दि. १६ ऑक्टोबर रोजी मंत्री जयकुमार गोरे यांच्या वाढदिवशी, म्हणजेच १५ ऑक्टोबर रोजी बीड जिल्हा रुग्णालयात जन्मलेल्या सर्व बालकांसाठी ड्रेस व मच्छरदाणीचे वाटप. या सामाजिक उपक्रमांच्या माध्यमातून गरजूंच्या चेहर्यावर आनंद फुलविणे, शेतकरी व पशुधनाप्रती संवेदनशीलता जपणे, तसेच समाजात सेवाभाव आणि सामाजिक बांधिलकीचा संदेश पोहोचविण्याचा महात्मा फुले युवा दलाचा प्रयत्न आहे. या सर्व समाजोपयोगी उपक्रमांमध्ये महात्मा फुले युवा दलाचे पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समाजबांधवांनी उत्स्फूर्तपणे सहभागी व्हावे असे आवाहन महात्मा फुले युवा दलाचे संस्थापक अध्यक्ष एड.सतीश शिंदे यांनी केले आहे.

## राजस्थानी विद्यालयातील विभागीय पातळीवरील संघाचा सन्मान व मेडल वितरण सोहळा संपन्न

माजलगाव । प्रतिनिधी

माहेश्वरी शिक्षण प्रसारक संस्था, माजलगाव संचलित राजस्थानी माध्यमिक विद्यालयातील १४ वर्षांखालील क्रिकेट संघातील तब्बल १६ खेळाडूंची विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झाली आहे. या उल्लेखनीय यशाबद्दल तसेच विविध क्रीडा प्रकारांत विशेष प्रावीण्य प्राप्त केलेल्या विद्यार्थ्यांचा सन्मान करण्यासाठी संस्थेच्या वतीने सन्मान सोहळा व मेडल वितरण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

या कार्यक्रमात विभागीय क्रिकेट स्पर्धेसाठी निवड झालेल्या खेळाडूंचे अभिनंदन करून त्यांना पुढील स्पर्धांसाठी शुभेच्छा देण्यात आल्या. तसेच विविध खेळांमध्ये उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या विद्यार्थ्यांना मेडल प्रदान करून त्यांच्या क्रीडागुणांचा गौरव करण्यात आला. विद्यार्थ्यांनी शिक्षणासोबतच क्रीडा क्षेत्रातही आपले कौशल्य



विकसित करावे, शिस्त, संघभावना आणि मेहनतीच्या बळावर यश संपादन करावे, असा संदेश या कार्यक्रमातून संस्थेचे सचिव रामानंद लड्डा यांनी आपल्या भाषणात केले. विद्यालयातील विद्यार्थ्यांनी क्रीडा क्षेत्रात मिळवलेले हे यश संस्थेसाठी आणि शाळेसाठी अभिमानास्पद आहे.

या यशामुळे विद्यालयाच्या क्रीडा परंपरेत आणखी एक मानाचा तुरा रोवला गेला असून, खेळाडूंचे सर्व स्तरांतून अभिनंदन होत आहे. या कार्यक्रमात विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करतानारे क्रीडाशिक्षक मुंडे सर डोंगरे सर यांच्या ही सन्मान करण्यात आला. विद्यार्थ्यांच्या या उल्लेखनीय कामगिरी बद्दल संस्थेचे अध्यक्ष डॉ. आर. जे. बजाज हे या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान व होते व प्रमुख उपस्थिती गणेश लोहिया हे होते तर संस्थेचे सचिव रामानंदजी लड्डा, संस्थेचे उपाध्यक्ष ओमप्रकाश मानधने तसेच विद्यालयाचे मुख्याध्यापक तौर सर हे या कार्यक्रमास उपस्थित होते. विद्यार्थ्याना सर्वच स्तरातून अभिनंदन व शुभेच्छा मिळत आहेत.

# देवदूत प्रतिष्ठानच्या गौरी–गणपती सजावट स्पर्धेचा निकाल जाहीर

## सौ.अनुराधा डुबे, सौ.मीरा खांडेकर व सौ.मयुरी पाबळे प्रथम बक्षिसाच्या मानकरी

माजलगाव । प्रतिनिधी

महिला वर्गातील सुप्त कलागुणांना वाव मिळावा आणि लोप पावत चाललेल्या पारंपरिक सण–उत्सवाची संस्कृती नव्या पिढीत रुजावी, या उदात्त हेतूने देवदूत प्रतिष्ठानच्यावतीने आयोजित करण्यात आलेल्या भव्य गौरी–गणपती सजावट स्पर्धेचा अंतिम निकाल आज जाहीर करण्यात आला आहे. पहिले वर्ष असुनसुद्धा यंदाच्या स्पर्धेला धारूर शहर व ग्रामीण भागातील महिलांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला होता.

माजलगाव तालुक्यासाठी

घेण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ .मीरा गोपाळ खांडेकर, द्वितीय क्रमांक सौ.प्रीती भागवत कोकणे तर तृतीय क्रमांक सौ.माधवी विठ्ठलराव सोळंके यांनी पटकाविला आहे. तसेच परीक्षकांच्या मनाचा ठाव घेणाऱ्या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर झाले असून त्यात सौ.सरिता कडाप्पा गिराम, सौ.कविता विनायक रत्नपारखी, सौ. स्नेहल पुष्कराज चौकीदार, सौ.पुष्पा विष्णुदास करवा, सौ. मनीषा संदीप भुतडा, यांचा समावेश आहे.

धारूर

तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ. अनुराधा अनिल डुबे, द्वितीय क्रमांक सौ. शुभांगी महादेव सवाशे तर तृतीय क्रमांक सौ. श्वेता नारायण वडगावकर यांनी पटकाविला आहे. तसेच पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर झाले असून त्यात सौ. किरण कोकणे, सौ. अवंतिका अक्षय चिद्रवार, सौ. रेणुका ज्ञानेश्वर शिंदे, सौ. वर्षा लक्ष्मण शेवते आणि सौ. ऋतुजा रितेश चिद्रवार यांचा समावेश आहे.



वडवणी

तालुक्यासाठी घेण्यात आलेल्या या स्पर्धेत प्रथम क्रमांक सौ.मयुरी लखन पाबळे, द्वितीय क्रमांक सौ.उर्मिला भगवान काळे, तर तृतीय क्रमांक सौ.रत्नमाला तुकाराम जोशी यांनी पटकाविला आहे. तसेच सौ.आरती ऋषिकेश मसुरे, सौ.रुक्मिणी तेजस शिंदे, सौ.पुनम महेश सुरवसे, सौ.दिपाली रंजीत धस, सौ.सीमा किसन महागोविंद या पाच स्पर्धकांना उत्तेजनार्थ बक्षीस जाहीर झाले आहे.

स्पर्धेतील प्रथम क्रमांकाच्या विजेत्याला आकर्षक फ्रिज, द्वितीय क्रमांक विजेत्याला कुलर आणि तृतीय क्रमांकाच्या विजेत्याला मिक्सर हे बक्षीस देण्यात येणार आहे. तर उत्तेजनार्थ विजेत्यांना प्रत्येकी डिनर सेट देऊन गौरविण्यात येणार आहे. आयुष्मान भारत मिशन महाराष्ट्र समितीचे अध्यक्ष डॉ ओमप्रकाश शेटे यांच्या मार्गदर्शनाखाली देवदूत प्रतिष्ठानने ही स्पर्धा केवळ सजावट म्हणून न घेता, एक सांस्कृतिक चळवळ म्हणून घेतली होती.

सदरील स्पर्धेचा बक्षीस वितरण सोहळा हा अत्यंत शानदार पद्धतीने होणार आहे.शुक्रवार दि. २६ ऑक्टोबर २०२६ रोजी किल्ले धारूर येथील गरड मंगल कार्यालयात आयोजित 'होम मिनिस्टर – खेळ पैठणीचा' या विशेष कार्यक्रमात मान्यवरांच्या हस्ते सर्व विजेत्या महिलांना बक्षीस वितरण करण्यात येणार आहे. तरी सर्व स्पर्धक आणि महिला भगिनींनी या कार्यक्रमास मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन देवदूत प्रतिष्ठानच्यावतीने करण्यात आले आहे.

घराघरात गणपती–गौरी उत्सवात महिलांनी केलेल्या मेहनतीला सन्मान मिळावा, पर्यावरणपूरक आणि पारंपरिक सजावटीला प्रोत्साहन मिळावे आणि महिलांमध्ये एकोपा व आनंदी वातावरण निर्माण व्हावे हा मुख्य उद्देश होता. स्पर्धेसाठी सजावटीतील कल्पकता व नावीन्य, पारंपरिकतेचे जतन, पर्यावरणपूरक साहित्याचा वापर, स्वच्छता व मांडणीचे सौंदर्य, सामाजिक संदेश आणि एकूणच सादरीकरण या निकषांवर परीक्षकांनी अत्यंत बारकाईने परीक्षण करून हा अंतिम निकाल दिला आहे.

– सौ. शिल्पा ओमप्रकाश शेटे

# शेतकऱ्यांना लवकरच मदत मिळेल

## दुष्काळी पंचनामे चार ते पाच दिवसांत पूर्ण होणार–कृषिमंत्री भरणे



**पुणे । प्रतिनिधी**

**दुष्काळाचा ट्रिगर–१ लागू झालेल्या २६५ तालुक्यांमध्ये ८१ टक्के पंचनाम्याचे काम पूर्ण झाले आहे. एकूण १ कोटी ५० लाख हेक्टर क्षेत्र असून, त्यापैकी १ कोटी २३ लाख हेक्टरपर्यंतच्या क्षेत्रावरील पंचनामे पूर्ण झाले आहे. उर्वरित काम चार ते पाच दिवसांत पूर्ण होईल आणि शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत देऊ, अशी ग्वाही कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.**

ते मंगळवारी (दि. १३ ऑक्टोबर) पत्रकारांशी बोलत होते. पीक नुकसानीचे पंचनामे सुरु आहेत. या कठीण काळात शेतकऱ्यांना लवकरात लवकर मदत कशी पोहोचेल? अशी सरकारची भूमिका असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. केंद्राचे पथक पाहणी करुन गेले आहे. राज्यातील परिस्थितीची संपूर्ण माहिती त्यांना दिली. केंद्राकडून मदत असेल अथवा राज्य सरकारच्या वतीने मदत असेल. तसेच पीक विमा, कृषी, जलसंधारण विभागाच्या माध्यमातून शेतकऱ्यांना काय मदत करणे गरजेचे आहे? यासाठी प्रयत्न सुरु असून, लवकरात लवकर शेतकऱ्यांना मदत देऊ, असे कृषिमंत्र्यांनी सांगितले. राज्यातील शेतकरी सध्या दुष्काळ परिस्थितीचा सामना करत आहेत. राज्यातील शेतकऱ्यांसाठी हा कठीण काळ असल्याचे त्यांनी म्हटले आहे. अशा परिस्थितीत बँका, मायक्रो फायनान्स कंपन्यांनी शेतकऱ्यांकडून जबरदस्तीने कर्जवसुली करु नये. असे जर कोणी करत असेल तर त्यांच्यावर सरकारच्या वतीने कारवाई केली जाईल, असा इशारा त्यांनी दिला.

### शेती योजनांच्या अंमलबजावणीला गती

मंत्रालयात केंद्र आणि राज्य पुरस्कृत योजनांच्या अंमलबजावणीबाबत ऑनलाईन माध्यमातून महत्त्वाची आढावा बैठक घेण्यात आली. या बैठकीत कृषी विभागाच्या विविध योजनांची सद्यस्थिती, अंमलबजावणीतील प्रगती आणि योजनांचा लाभ पात्र शेतकऱ्यांपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याबाबत चर्चा करण्यात आली. योजनांची अंमलबजावणी अधिक गतिमान आणि परिणामकारक करण्यासोबतच कामकाजात समन्वय राखण्यावर भर देण्यात आला, अशीही माहिती त्यांनी दिली.

# शेळ्या मेंढ्यांना होणारा 'निळी जीभ' आजार जाणून घ्या कारणे, लक्षणे आणि उपाय!



**जनावरांना होणारा निळी जीभ आजार प्रामुख्याने विशेषतः ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबर महिन्यात होतो. हा रोग मुख्यतः शेळ्या आणि मेंढ्यांना होतो, गुरेढोरे फार क्वचितच या आजाराने प्रभावित होतात. विषाणूमुळे होणारा हा रोग संसर्गजन्य नसला तरी एक वर्षाच्या वयोगटातील कोवळया शेळ्या, मेंढ्यांना या रोगाचा धोका असतो. दूध पिणारी कोकरू तुलनेने या रोगास प्रतिरोधक असतात.**

**निळी जीभ आजाराची कारणे :**

ओरबीव्हायरस नावाच्या विषाणूमुळे हा रोग होतो. पावसाळ्यातील रक्त शोषणाऱ्या कीटकापासून या रोगाचे विषाणू पसरतात. डासामार्फत सुद्धा या रोगाचा प्रसार होतो. वीर्य आणि प्लेसेंटल मार्गाद्वारे सुद्धा संक्रमण होऊ शकते.

**निळी जीभ आजाराची लक्षणे :**

या आजारात जनावरांना ताप येतो, नाकातून स्त्राव येऊन नाक लाल होते, सुजते. तोंडातून लाळ येऊन जीभ काळी- निळी पडते. खुरांना सूज येते व ते लंगडायला लागतात. दुर्गंधीयुक्त अतिसार होऊन जनावरे मलूल होतात. जनावरांना श्वास घ्यायला त्रास होतो, ते घोरतात. श्वसनक्रिया बंद पडल्यास मृत्यू सुद्धा होऊ शकतो.

**आजारावर प्रथमोपचार व उपचार :**

सर्वात प्रथम आजारी जनावरांना वेगळे करावे व त्यांना सूर्यप्रकाशापासून दूर ठेवावे. बाधित जनावरांना पुरेशी विश्रांती द्यावी, चरायला पाठवू नये. बाधित जनावरांना तांदूळ, नाचणी, यांची लापशी खाऊ घालावी. जनावरांच्या व्रणावर/अल्सरवर ग्लिसरीन लावावे. तोंडातील अल्सरवर खारट पाण्याने उपचार केले जाऊ शकतात किंवा १ ग्रॅम पोटॅशियम परमँगनेट १ लिटर पाण्यात मिसळून दिवसातून २ ते ३ वेळा या द्रावणाने तोंड धुवावे. बाधित मेंढ्यांना प्रतिजैविक देण्यासाठी किंवा लक्षणात्मक उपचारांबाबत पुढील सल्ल्यासाठी तुमच्या जवळच्या पशुवैद्यकीय डॉक्टरांशी संपर्क साधावा.

**प्रतिबंधात्मक उपाय :**

नियमित अंतराने जनावरांचे योग्य लसीकरण करावे. रोगाचा प्रादुर्भाव असलेल्या भागातून जनावरांची आयात टाळावी.

# ठिबक सिंचन करून करा पाण्याची बचत

**ठिबक सिंचन पद्धतीचा वापर करून शेतकरी साधारणपणे ३०% ते ५०% (काही पिकांमध्ये ८०% पर्यंत) पाण्याची बचत करू शकतात. लहान शेतकऱ्यांसाठी ठिबक सिंचनातून जास्तीत जास्त पाण्याची बचत आणि योग्य व्यवस्थापन करण्यासाठी खालील महत्त्वाचे मार्गदर्शन उपयुक्त ठरेल:**



**पाण्याची बचत कशी होती?**

थेट मुळांवर पाणी: या पद्धतीत पाणी वाया न जाता थेंबाथेंबाने थेट वनस्पतीच्या मुळाशी सोडले जाते. बाष्पीभवन आणि गळती नाही: उन्हामुळे हवेत पाण्याचे बाष्पीभवन होत नाही आणि पाणी वाहून जात नाही. तणांवर नियंत्रण: पिकांच्या दोन ओळींमधील जमीन कोरडी राहते, ज्यामुळे तण (गवत) वाढत नाही आणि पाण्याचा अपव्यय टळतो.

**लहान शेतकऱ्यांसाठी प्रभावी:**

वेळेचे योग्य नियोजन: पिकाच्या वाढीच्या अवस्थेनुसार आणि जमिनीच्या प्रकारानुसार ठिबक संच चालवण्याचा कालावधी ठरवावा. त्यासाठी कृषी विभागाचे किंवा महात्मा फुले कृषी विद्यापीठाचे 'ठिबक सिंचन शेड्युलर' किंवा मार्गदर्शन वापरावे. मल्चिंगचा (आच्छादनाचा) वापर: ठिबक सिंचनासोबत जमिनीवर प्लास्टिक मल्चिंग पेपरचा वापर केल्यास जमिनीतील ओलावा टिकून राहतो आणि पाण्याची बचत आणखी वाढते. पाण्याचे मोजमाप: उपलब्ध पाण्याचा अपव्यय टाळण्यासाठी पाणी मोजून वापरावे.

**ठिबक संचाची देखभाल व स्वच्छता :**

गाळण्यांची साफसफाई: वाळू आणि जाळीच्या गाळण्या आठवड्यातून किमान एकदा नीट धुवून साफ कराव्या. फ्लशिंग करणे: पाईपलाईन आणि उपनळ्यांचे शेवटचे टोक उघडून महिन्यातून किंवा पंधरवड्यातून एकदा फ्लशिंग करावे, जेणेकरून साचलेला कचरा निघून जाईल. ड्रिपर्स बंद होण्यापासून रोखणे: ड्रिपर्स (थेंबणारे नॉझल) बंद पडू नयेत म्हणून वेळोवेळी क्लोरिनेशन प्रक्रिया करावी। गळती होत असल्यास ताबडतोब दुरुस्ती करावी. संभाळ: हंगाम संपल्यानंतर किंवा संच वापरत नसताना उपनळ्या गुंडाळून सावलीत सुरक्षित ठेवाव्यात.

**अतिरिक्त फायदे :**

खतांची बचत : ठिबक वाटेच विरघळणारी खते दिल्याने खतांचा अपव्यय २५% पर्यंत होतो आणि पिकांना योग्य पोषण मिळते. उत्पादनात वाढ: ओलाव्याचे योग्य समतोल राखल्यामुळे पिकाच्या गुणवत्तेत आणि उत्पादनात १० ते २५% किंवा त्याहून अधिक वाढ होते.

# उन्हाळ्यात फळबागा कशा जगवाल?

**राज्यातील कमी पाऊस झाल्याने त्याचा परिणाम फळबागेवर होताना दिसत आहे. सूर्यप्रकाश, गरम वारे, कोरडी हवा याचा विपरीत परिणाम नवीन लावलेल्या फळझाडांवर तसेच फळे देणाऱ्या झाडांवर होत असतो. यामुळे मुख्यत्वे कोवळी फुट करपणे,खोड तडकणे,फळगळ होणे,फळांचा आकार लहान होणे,सर्व पाने ,फळे गळून झाडे वाळून जाणे,झाडांची वाढ थांबणे आणि शेवटी झाड मरणे असे प्रकार होतात याकरिता पाण्याचा आणि उपलब्ध साधनांचा कार्यक्षम वापर उन्हापासून बचाव करण्या करिता करावयास हवा.**



**पाण्याचा कार्यक्षम वापर :**

उन्हाळ्यामध्ये शक्यतो ठिबक सिंचन किंवा भूमिगत सिंचन पद्धतीने थेट फळझाडांच्या मुळापाशी गरजेनुसार पाणी द्यावे. या पद्धती दुष्काळी क्षेत्रामधे किंवा पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्राकरिता अत्यंत फायदेशीर आहेत.या पद्धतीत इतर प्रचलित पद्धतीपेक्षा ५० ते ६० टक्के पाण्याची बचत होते व उत्पादनात १० ते १५ टक्के वाढ मिळू शकते. या पद्धतीमुळे झाडांच्या गरजेनुसार पाणी मोजून देता येते व पाण्याचा अपव्यय होत नाही. पाण्याबरोबर खतेदेता येतात,त्यामुळे खताच्या खर्चात बचत होते. फळबागेस/पिकास पाणी सकाळी अथवा रात्री दिल्यास पाण्याचा कार्यक्षम वापर होतो. पाण्याची कमतरता असलेल्या क्षेत्रात एक आड एक सरीने पाणी द्यावे. तसेच पाणी देण्याच्या पाळीत (अंतरात) वाढ करावी. उदाहणार्थ एखाद्या बागेस १० दिवसाच्या अंतराने पाणी देत असाल तर पुढील पाणी १२ दिवसाने,त्यापुढील पाणी १५ दिवसाने अशा प्रकारे जमिनीचा मगदूर,तापमान आणि पाण्याची उपलब्धता लक्षात घ्यावी.

**मडका सिंचन पद्धत :**

कमी क्षेत्रातील व जास्त अंतरावरील फळझाडांना ही पाणी देण्याची पद्धत आर्थिकदृष्ट्या फायदेशीर ठरते.या पद्धतीत लहान झाडांना साधारणता दोनते तीन वर्षाकरिता ५ ते ७ लिटर पाणी बसणारी लहान मडकी वापरावीत व जास्त वयाच्या मोठ्या झाडांकरिता १० ते १५ लिटर पाणी बसेल अशी मडकी वापरावीत.मडकी शक्यतो जादा छिद्रांकीत किंवाआढीत कमी भाजलेली असावीत. पक्क्या भाजलेल्या मडक्याच्या बुडाकडील बाजूस लहानसे छिद्र पाडावे व त्यामध्ये कापडाची चिंधी किंवा नारळाची शेंडी बसवावी.प्रत्येक झाडास दोन मडकी जमिनीत खड्डा खोडून बसवावीत व त्यामध्ये संध्याकाळी पाणी भरून ठेवावे.मडके पाण्याने भरल्यानंतर त्यावर झाकणी किंवा लाकडी फळी ठेवावी.त्यामुळे मडक्यातील पाणी बाष्पीभवनाने वाया जाणार नाही.या पद्धतीमुळे ७०- ७५ टक्के पाण्याची बचत होते.

**आच्छादनांचा वापर करणे :**

उन्हाळ्यात बाष्पीभवनामुळे जमिनीतून पाण्याचे अधिक उत्सर्जन होते.आच्छादनांचा वापर केल्यामुळे बाष्पीभवनाचा वेग कमी करता येतो.त्यामुळे जमिनीतील ओलावा टिकवून राहण्यास मदत होते.आच्छादनाकरिता पालापाचोळा,वाळलेले गवत,लाकडी भूसा,उसाचे पाचट,गव्हाचे काड,भाताचे तुस अशा सेंद्रिय संसाधनांचा वापर करावा.सेंद्रिय आच्छादनाची जाडी १२ ते १५ से.मी असावी. सेंद्रिय स्वरूपाचे आच्छादने वापरल्यास जमिनीचा पोत सुधारण्यास मदत होते. सध्या आच्छादनासाठी पॉलिथीन फिल्मचा वापर मोठ्या प्रमाणात होऊ लागला आहे. आच्छादनामुळे सूर्यप्रकाश न मिळाल्यामुळे तणांची वाढ होत नाही, तसेच जमिनीचे तापमान नियंत्रित राहते. जमिनीत उपयुक्त जीवाणूंची वाढ होण्यास मदत होते. सेंद्रिय पदार्थांचे आच्छादनअसेल तर कालांतराने कुजून त्यापासून उत्कृष्ट सेंद्रिय खत मिळते. आच्छादनांमुळे जमिनीची धूप कमी होते तसेच जमिनीस भेगा पडण्याचे प्रमाण कमी होते. आच्छादनामुळे दिलेल्या खताचा जास्त कार्यक्षमरित्या उपयोग करून घेता येतो.

**बाष्परोधकाचा वापर :**

फळझाडांनी जमिनीमधून शोषलेल्या एकूण पाण्यापैकी ९५ टक्के पाणी वनस्पती पर्णोत्सर्जनाद्वारे हवेत सोडतात. हे वाया जाणारे पाणी बाष्परोधकाचा वापर करून अडविता येते. बाष्परोधके ही दोन प्रकारची असतात. पर्णरंध्रेबंद करणारी उदा. फिनील मरक्यूरी ॲसिटेट, ॲबसिसिक ॲसिड व पानावर पातळ थर तयार करणारी उदा. केओलीन,सिलिकॅान ऑईल,मेंण इत्यादी.उन्हाळ्यातील पाणीटंचाईस तोंड देण्यासाठी बाष्पच्छादनाबरोबर, बाष्परोधकाचा वापर केल्यास पाण्याची बचत होते. उन्हाळ्यात ६ ते ८ टक्के (६०० ते ८०० ग्रॅम प्रति १० लिटर पाणी) तीव्रतेचे केओलीन फवारे २१ दिवसाच्या अंतराने किमान २ ते ३ वेळा करावेत किंवा पी.एम ए (फिनील मरक्यूरी ॲसिटेट) या बाष्परोधकाचे ८०० मिलीग्रॅम प्रती १० लिटर पाण्यात मिसळून फवारणी करावी.

**लहान रोपांना सावली करणे :**

नवीन लागवड केलेल्या फळझाडांना पहिल्या एक-दोन वर्ष कडक उन्हापासून सरंक्षण देण्यासाठी सावली करावी.झाडाच्या दोन्ही बाजूंना ३ फुट लांबीचे बांबू रोवावेत.या बाबूंना चारही बाजूने व मधून तिरकस असे बांबू किंवा कामट्या बांध्याव्यात. त्यावर वाळलेले गवत अंथरावे.या गवतावरून तिरकस काड्या सुतळीने व्यवस्थित बांध्याव्यात.वाळलेल्या गवता ऐवजी बारदाना किंवा शेडनेटचा वापर करावा.

**वारा प्रतिरोधकाचा किंवा कुंपणाचा वापर करणे :**

उन्हाळ्यात वाऱ्याची गती १८ ते २० कि. मी. प्रति तास असल्यास जमिनीतील ओलाव्याचे बाष्पीभवन मोठ्या प्रमाणावर होते.बागेभोवती अगदी सुरुवातीलाच शेवरी,मलबेरी,चिलार,विलायती चिंच,सुबाभूळ, ग्लिरीसीडीया, सुरु,शेर,निवडुंग यापैकी उपलब्ध वनस्पतींची कुपंणां करिता लागवड करावी.अशा कुंपणामुळे वारा वादळाचा बागेला त्रास होत नाही.गरम वाऱ्यापासून फळबागांचे सरक्षण होते. बाष्पीभवनाचा वेग कमी होतो.बागेस कमी प्रमाणात पाणी लागते.

## दिन विशेष

### महत्वाच्या घटना

१८४६ : अमेरिकन डॉक्टर डॉ. जॉन वॉरेन यांनी शस्त्रक्रिया करताना भूल देण्यासाठी सर्वप्रथम इथर या रसायनाचा वापर केला.

१८७८ : एडिसन इलेक्ट्रिक लाईट कंपनीचे काम सुरू झाले.

१८८८ : गोपाळ गणेश आगरकरांच्या 'सुधारक' पत्राची सुरूवात

१९१७ : पहिले महायुद्ध जर्मनीसाठी हेरगिरी केल्याबद्दल डच नर्तिका माता हारी हिला पॅरिसजवळ गोळ्या घालून मृत्युदंड देण्यात आला.

१९३२ : टाटा एअरलाइन्सचे पहिले उड्डाण झाले. जे. आर. डी. टाटा यांनी हे विमान कराचीहुन मुंबई येथे आणले व नागरी विमानसेवेची सुरुवात केली. याच कंपनीचे पुढे राष्ट्रीयीकरण होऊन एअर इंडिया ही कंपनी अस्तित्त्वात आली.

१९३५ : टाटा एअरलाइन्सचे पहिले उड्डाण झाले. जे. आर. डी. टाटा यांनी हे विमान कराचीहुन मुंबई येथे आणले व नागरी विमानसेवेची सुरुवात केली. याच कंपनीचे पुढे राष्ट्रीयीकरण होऊन 'एअर इंडिया' ही कंपनी अस्तित्त्वात आली. (व पुढे तिचा बोर्या वाजताना आपण पाहतोच आहे)

१९६८ : हरगोविंद खुराणा यांना नोबेल पारितोषिक प्रदान.

१९७० : अन्वर सदत यांची मिस्त्र देशाच्या राष्ट्रपती पदी नियुक्ती करण्यात आली.

१९७५ : बांगलादेशातील रहिमा बानू ही २ वर्षांची मुलगी ही देवी रोगाचा शेवटचा रुग्ण ठरली.

१९८४ : आर्च बिशप डेसमंड टुटू यांना शांततेचा नोबेल पुरस्कार जाहीर.

१९८८ : उज्वला पाटील ह्या संपूर्ण जगाची समुद्र यात्रा करणाऱ्या पहिल्या महिला बनल्या.

१९९३ : वर्णभेदामुळे निर्माण झालेला अविश्वास दूर करुन, दक्षिण अफ्रिकेत लोकशाही रुजवण्याच्या प्रयत्नांबद्दल अफ्रिकन नॅशनल काँग्रेसचे नेते नेल्सन मंडेला आणि दक्षिण अफ्रिकेचे अध्यक्ष एफ. डब्ल्यू. डी. क्लर्क यांना शांततेसाठीचा नोबेल पुरस्कार जाहीर

१९९७ : भारतीय लेखिका अरुंधती रॉय यांच्या 'द गॉड ऑफ स्मॉल थिंग्ज' या कादंबरीला साहित्य क्षेत्रात प्रतिष्ठेचा समजला जाणारा 'बुकर पुरस्कार' मिळाला.

१९९९ : जागतिक फ्रेड डेव्हिस पुरस्कार भारताच्या गीत सेठी यांना प्रदान.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

१५४२ : बादशाह अकबर हिन्दुस्तानचा तिसरा मुघल सम्राट (मृत्यू: १२ आक्टोबर १६०५)

१६०८ : इव्हानजेलिस्टा टॉरिसेली इटालियन गणिती व पदार्थ वैज्ञानिक, हवादाबमापीचा () संशोधक (मृत्यू: २५ आक्टोबर १६४७)

१८८१ : पी. जी. वूडहाऊस इंग्लिश लेखक (मृत्यू: १४ फेब्रुवारी १९७५)

१८४१ : जपानचे पहिले पंतप्रधान इटो हिरोबुमी यांचा जन्म.

१९०८ : जे. के. गालब्रेथ कॅनेडियन-अमेरिकन अर्थशास्त्रज्ञ (मृत्यू: २९ एप्रिल २००६)

१९२० : मारिओ पुझो अमेरिकन लेखक (मृत्यू: २ जुलै १९९९)

१९२६ : नारायण गंगाराम सुर्वे कवी (मृत्यू: १६ ऑगस्ट २०१०)

१९३१ : अवुल पाकिर जैनुलब्दीन उर्फ ए. पी. जे. अब्दुल कलाम वैज्ञानिक आणि भारताचे वे११ राष्ट्रपती, एकात्मिक क्षेपणास्त्र विकास कार्यक्रमाचे जनक, पंतप्रधानांचे प्रमुख वैज्ञानिक सल्लागार, पद्मभूषण (१९८१), पद्मविभूषण (१९९०), भारतरत्न (१९९७). राष्ट्रपती होण्यापुर्वी 'भारतरत्न' हा भारताचा सर्वोच्च नागरी सन्मान मिळालेले ते भारताचे तिसरे राष्ट्रपती आहेत. याआधी डॉ. सर्वपल्ली राधाकृष्णन (१९५४) आणि डॉ. झाकिर हुसेन (१९६३) या भारतरत्न मिळालेल्या व्यक्ति पुढे राष्ट्रपती झाल्या.

१९३४ : एन. रामाणी कर्नाटिक शैलीचे बासरीवादक

१९४९ : प्रणोय रॉय पत्रकार, एन. डी. टी. व्ही. चे संस्थापक

१९५२ : प्रसिद्ध भारतीय राजकारणी व छत्तीसगड राज्याचे पूर्व दुसऱ्या क्रमांकाचे मुख्यमंत्री रमण सिंह यांचा जन्मदिन.

१९५५ : भारतीय फील्ड हॉकी खेळाडू कुलबुर भौर यांचा जन्म.

१९५७ : मीरा नायर भारतीय वंशाच्या अमेरिकन चित्रपट निर्मात्या व दिग्दर्शिका

१९६९ : पं. संजीव अभ्यंकर मेवाती घराण्याचे शास्त्रीय गायक

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१७८९ : रामचंद्र विश्वनाथ तथा रामशास्त्री प्रभुणे उत्तर पेशवाईतील प्रामाणिक, निष्पक्षपाती, निर्भीड आणि प्रसिद्ध न्यायाधीश, पुणे दरबारात १५७१ मधे त्यांची शास्त्री म्हणून नेमणूक झाली. थोरले माधवराव जेव्हा पेशवे झाले तेव्हा रामशास्त्री सरन्यायाधीश होते. (जन्म: ? ? १७२०)

१७९३ : फ्रेंच राज्यक्रांती फ्रान्सचा राजा लुई (सोळावा) यांची विधवा पत्नी मेरी अँटोनिएत हिचा गिलोटीनवर वध करण्यात आला.

१८९६ : स्वातंत्र्यसैनिक, लोकसभेचे हंगामी सभापती सेठ गोविंद दास यांचा जन्म.

१९१७ : माता हारी पहिल्या महायुद्धात गाजलेली डच नर्तिका, सौंदर्यवती व गुप्तहेर (जन्म: ७ ऑगस्ट १८७६)

१९१८ : साई बाबा (जन्म:)

१९३० : हर्बर्ट डाऊ अमेरिकन उद्योगपती (जन्म: २६ फेब्रुवारी १८६६)

१९४४ : ओगले काच कारखान्याचे एक संस्थापक गुरुनाथ प्रभाकर ओगले यांचे निधन.

१९४६ : हर्मन गोअरिंग जर्मन नाझी (जन्म: १२ जानेवारी १८९३)

१९६१ : सूर्यकांत त्रिपाठी 'निराला' हिन्दी साहित्यिक. त्यांनी ४४ ग्रंथ लिहिले. कन्येच्या मृत्यूनंतर त्यांनी लिहिलेल्या 'सरोजस्मृती' या शोकगीताची हिन्दीतील सर्वश्रेष्ठ विलापिकांमध्ये गणना होते. (जन्म: २१ फेब्रुवारी १८९६)

१९८१ : इस्रायली सेना प्रमुख व परराष्ट्रमंत्री, संरक्षणमंत्री मोशे दायान यांचे निधन.

२००२ : वसंत सबनीस लेखक व पटकथाकार (जन्म: ६ डिसेंबर १९२३)

२०१२ : कंबोडिया देशाचे पहिले पंतप्रधान नॉरदॉम सिहानोक यांचे निधन. (जन्म: ३१ ऑक्टोबर १९२२)

# उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे -जी.श्रीकांत

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीत सर्व उमेदवारांनी निवडणूक आयोगाच्या सूचनांचे काटेकोरपणे पालन करावे. मतदारांमध्ये मतदानाबाबत जागृती निर्माण करण्यासाठी उमेदवारांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन निवडणूक निर्णय अधिकारी तथा विभागीय आयुक्त जी. श्रीकांत यांनी केले.

औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघाची निवडणूक लढविणाऱ्या उमेदवारांच्या बैठकीत ते बोलत होते. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे, मंजुषा मिसकर, देविदास टेकाळे व उमेदवार उपस्थित होते. निवडणूक प्रक्रिया सुरळीत, पारदर्शक व नियमानुसार पार पाडण्यासाठी आवश्यक सूचना यावेळी देण्यात आल्या. निवडणूक प्रक्रियेबाबत काही तक्रारी किंवा सूचना असल्यास संबंधित जिल्हाधिकाऱ्यांकडे सादर कराव्यात, असेही श्रीकांत यांनी सांगितले.

या मतदारसंघात एकूण ३ लाख २६ हजार ७०१ मतदार असून, मतदानासाठी ८४२ केंद्रे निश्चित करण्यात आली आहेत. निवडणूक प्रक्रिया पार पाडण्यासाठी सुमारे ३५० अधिकारी नियुक्त करण्यात आले आहेत. उमेदवार व त्यांच्या अधिकृत प्रतिनिधींनी आवश्यक कागदपत्रे व अद्ययावत ओळखपत्रे सादर करावीत. ओळखपत्राशिवाय मतदान केंद्रात प्रवेश मिळणार नाही. मतदान केंद्रात भ्रमणध्वनी व अन्य इलेक्ट्रॉनिक साधनांचा वापर करण्यास मनाई आहे. मतदान प्रक्रियेत कोणताही हस्तक्षेप खपवून घेतला जाणार नसून, नियमांचे उल्लंघन करणाऱ्यांवर कायदेशीर कारवाई करण्यात येईल, असे त्यांनी स्पष्ट केले.

मतदानाच्या ४८ तास आधी सर्व प्रकारचा निवडणूक प्रचार बंद करणे बंधनकारक आहे. या कालावधीत सभा, ऑनलाइन माध्यमांद्वारे प्रचार व मतदारांवर प्रभाव टाकणाऱ्या प्रचारात्मक कृती करता




**औरंगाबाद विभाग पदवीधर मतदारसंघातील उमेदवारांची बैठक**

येणार नाहीत. प्रचारासाठी वापरण्यात येणाऱ्या वाहनांसाठी संबंधित जिल्हाधिकारी किंवा स्थानिक प्रशासनाची परवानगी घ्यावी. छापील प्रचार साहित्यावर मुद्रक व प्रकाशकाचे नाव व पत्ता नमूद करावा. जात, धर्म, भाषा किंवा लिंगाच्या आधारावर मतदारांमध्ये भेदभाव निर्माण करणाऱ्या प्रचारास मनाई आहे. तसेच, मतदारांना प्रलोभने देणे, धार्मिक स्थळांवर प्रचार करणे, मतदानाची गोपनीयता भंग करणे व मतदान केंद्राजवळ प्रचार करणे प्रतिबंधित आहे. बोगस मतदानाची बाब निदर्शनास आल्यास तातडीने निवडणूक अधिकाऱ्यांकडे तक्रार करावी, असे आवाहन त्यांनी केले.

उमेदवारांच्या मदतीसाठी विभागीय आयुक्त कार्यालयामध्ये तसेच मराठवाडा विभागातील सर्व जिल्हाधिकारी कार्यालयात वेगवेगळे कक्ष उभारण्यात आले आहे. या ठिकाणावरून उमेदवारांना निवडणूक प्रक्रियेतील सर्व आवश्यक सोयी सुविधा व मार्गदर्शन मिळेल. प्रसार माध्यमांसंदर्भातील जाहिरातींचा मजकूर तपासणे आवश्यक आहे. यासाठी माध्यम सनियंत्रण व प्रमाणन केंद्र कक्षातून परवानगी घेणे आवश्यक आहे. जिल्हाधिकारी तथा जिल्हा उप निवडणूक अधिकारी म्हणून जिल्हाधिकारी कार्यरत असून या आठही जिल्ह्याच्या जिल्हाधिकारी कार्यालयातून आवश्यक त्या परवानगी घेण्यात याव्या असेही त्यांनी यावेळी स्पष्ट केले.

मतमोजणी प्रक्रियेची माहिती देण्यासाठी १५ ऑक्टोबर रोजी वंदे मातरम्? सभागृहात प्रशिक्षण आयोजित करण्यात येणार आहे. मतमोजणीच्या तीन ते चार दिवस आधी प्रतिनिधींची यादी जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करावी. मतमोजणीसाठी ७० टेबल व टपाली मतपत्रिकांसाठी एक टेबल, असे एकूण ७१ टेबल असतील.

प्रत्येक उमेदवाराला प्रत्येक टेबलासाठी एक याप्रमाणे ७१ प्रतिनिधी नेमता येतील. त्यासाठी निवडणूक आयोगाच्या विहित नमुन्यात अर्ज भरून ओळखपत्र घेणे आवश्यक आहे. मतमोजणीत आवश्यक मतसंख्या कोणत्याही उमेदवाराला न मिळाल्यास सर्वांत कमी मते मिळालेल्या उमेदवाराला बाद करून त्याच्या मतपत्रिकांवरील पुढील पसंतीक्रमानुसार मतांचे हस्तांतरण केले जाईल. यावेळी सहआयुक्त प्रताप काळे व मंजुषा मिसकर यांनी निवडणूक प्रक्रिया, आचारसंहितेचे पालन, मतदान प्रतिनिधींची नियुक्ती, प्रचार साहित्याच्या मुद्रणाचे नियम व मतदानाच्या दिवशी पाळावयाच्या नियमांची माहिती दिली.

# गांजाच्या शेतामध्ये कारवाई, १६ लाखाचा मुद्देमाल जप्त

जालना । प्रतिनिधी

तेगबिर सिंह संधू पोलीस अधिक्षक व मा. विक्रम साळी अप्पर पोलीस अधिक्षक यांनी अवैधं गांजा विक्री करणा-या विरुध्द कारवाई करणेबाबत आदेशीत करण्यात आले होते. त्या अनुषंगाने गुप्त बातमीदारा मार्फत खात्रीशीर बातमी मिळाली की, वैदयवडगाव शेत शिवारात शेतात एक इसम गांजाची झाडे लावून गांजाचे उत्पादन करीत असल्याची माहिती मिळाल्याने त्यावरून वैदयवडगाव शेत शिवारात सेवली पोलीस व अंमली पदार्थ विरोधी पथक जालना दिनकर वैदय यांच्या शेतामध्ये छापा टाकला असता जनावनारे यांना खाण्यासाठी गजरा गवताचे शेतात ४१ किलो वजनाची ओलो गांजाची झाडे मिळून आल्याने सदर इसमास ताब्यात घेवून त्याचे नाव दिनकर दत्ताराव वैदय वय-५० वर्षे, रा. वैदयवडगाव ता. मंठा जि. जालना असे नाव सांगितले सदरचे शेत हे माझ्या मालकीचे




असुन गांजाच्या झाडांची लागवड मीच केली आहे. वैगैरे सांगितल्याने त्यास ताब्यात घेवून पो. स्टे सेबली येथे गुन्हा दाखल केला आहे.

याप्रकरणी १६,४०,०००/- लाख रुपये किंमतीचे ओला गांजाची झाडे जप्त करण्यात आली

आरोपी दिनकर दत्तराव वैदय यांच्यावर कारवाई करण्यात आली. सदरची कारवाई पोलीस अधिक्षक , अप्पर पोलोस अधिक्षक , मा. रामेश्वर रेंगे उपविभागीय पोलीस अधिकारी परतुर यांच्या मार्गदर्शनाखाली मा. सपोनि आनंदसिंग साबळे पोलीस ठाणे सेवली, सपोनि सचिन इंगेवाड अंमली पदार्थ विरोधी पथक, पोउर्पान/एस.एम.शेख पोलीस ठाणे सेवली, सफी मारोती शिवरकर, पोहेको विनोद गडदे, पोहेको महेंद्र सोनवणे, नेमणूक सर्व अंमलीपदार्थ विरोधी पथक, पोहेकों/संतोष चव्हाण, पोकों/ प्रल्हाद चिरफरे, पोकों/सुनिल जाधव, पोकों/ पांडूरंग निंबाळकर, पोकों/ अशोक डोईफोडे, चापोकों शुभम बडूगे सर्व नेमणूक पोलीस ठाणे सेवली

# जिल्हाधिकाऱ्यांच्या पुढाकारातून प्रलंबित रस्ता अखेर मोकळा !

जालना । प्रतिनिधी

परतूर तालुक्यातील मौजे सातारा (वाहेगाव) येथील अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेला रस्ता व स्मशानभूमीकडे जाणारा मार्ग जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांच्या आदेशानुसार गठित करण्यात आलेल्या कमिटीच्या यशस्वी मध्यस्थीमुळे व केलेल्या कारवाईमुळे मोकळा झाला. यामुळे स्थानिक ग्रामस्थ व शेतकऱ्यांना मोठा दिलासा मिळाला आहे.

मौजे सातारा (वाहेगाव) येथील शेत गट क्र. ११७ व ११८ ला ११४ मधून मुख्य रस्त्यापासूनचा सामाईक विहीर व श्मशानभूमी सर्व्हे नं. आणि गट नं. बांध, तसेच गट क्र. ११९/१४७ च्या बांधाने जाणारा रस्ता मागील काही दिवसांपासून बंद करण्यात आला होता. स्मशानभूमी आणि सामाईक



विहिरीकडे जाणारा हा मुख्य मार्ग बंद असल्याने स्थानिक नागरिकांची व शेतकऱ्यांची मोठी गैरसोय झाली होती. या प्रकरणाची जिल्हाधिकारी यांनी गांभीर्याने दखल घेत एक विशेष समिती नेमण्याचे आदेश दिले. या समितीने घटनास्थळी भेट देऊन सर्व संबंधित घटकांशी संवाद साधत सकारात्मक मध्यस्थी केली. समितीच्या यशस्वी मध्यस्थीमुळे व प्रशासकीय कारवाईमुळे बंद असलेला हा रस्ता पुन्हा सुरळीत व पूर्णपणे खुला करण्यात आला.

# केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या जाहीर सभेस उपस्थित रहा -मझर खान

**बीड शहरात पप्पू कागदे यांच्या वतीने विराट जाहीर सभा आयोजित**

बीड । प्रतिनिधी

केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांची बीड शहरात शुक्रवार दि.१६ ऑक्टोबर २०२६ रोजी दुपारी ठीक ४ वाजता छत्रपती संभाजी महाराज क्रीडांगण छत्रपती शिवाजी महाराज चौक बीड येथे आयोजित करण्यात आली आहे. रिपाइंच्या वतीने आयोजित विराट जाहीर सभेचे आयोजन खालील मागण्यांची शासन दरबारी पूर्तता करण्यासाठी युवा रिपाइं प्रदेशाध्यक्ष तथा रिपाइंचे बीड जिल्हाध्यक्ष पप्पू कागदे यांनी केले आहे.



राज्यासह मराठवाड्यात व बीड जिल्ह्यात पावसाने दडी मारल्यामुळे शेतकऱ्यांच्या तोंडाशी आलेला घास निसर्गाने हिरावून घेतला आहे. दुष्काळामुळे जनावरांच्या चाऱ्याचा पाण्याचा व मोल मजुरांच्या पोटापाण्याचा प्रश्न गंभीर झाला आहे. पावसाअभावी राज्यभर दुष्काळ जाहीर झाला आहे. दुष्काळ जन्य परिस्थितीचा सामना करण्यासाठी शेतकऱ्यांना प्रति हेक्टर १ लाख रुपये मदत देण्यात यावी. शेतमजूर, कामगार व मोलमजुरी करून पोट भरणाऱ्या कुटुंबियांना ५० हजार रुपये मदत जाहीर करण्यात यावी. अनु जातीमधील ५९ जातींच्या आरक्षणातील उपवर्गीकरणाची प्रक्रिया रद्द करण्यात यावी. कसत असलेल्या २०११ पर्यंतच्या गायरान जमिनीची प्रलंबित प्रकरणे निकाली काढण्यात यावीत. महागाई निर्देशांकानुसार विद्यार्थ्यांच्या शिष्यवृत्तीत वाढ करण्यात यावी.आदी मागण्याची पूर्तता करण्यासाठी केंद्रीय मंत्री रामदास आठवले यांच्या प्रमुख उपस्थितीत बीड शहरात दि. १६ ऑक्टोबर २०२६ शुक्रवार रोजी होणाऱ्या विराट जाहीर सभेस बीड जिल्ह्यातील रिपाइं पदाधिकारी, गायरान धारक, महिला, शेतमजूर, कामगार यांनी हजारोच्या संख्येने उपस्थित राहावे. असे आवाहन रिपाइंचे मराठवाडा उपाध्यक्ष मझर खान, राजू जोगदंड, अविनाश जोगदंड, महेश आठवले, विलास जोगदंड, शाम वीर, संभाजी गायकवाड, भैय्या मस्के, महेंद्र वडमारे, मनोज बोराडे, अक्षय कोकाटे, भैय्या साळवे, पप्पू वाघमारे, संजय हनवते, अमोल धन्वे, सचिन वडमारे, धम्मा पारवेकर, के.के कांबळे,आप्पा मिसळे, गौतम कांबळे आदींनी केले आहे.

# मुंगूसवाडे ग्रामपंचायत पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ खेडकर यांची नियुक्ती नियमबाह्य ?

**चौकशी करण्याची मागणी, अधिकारी पक्षपात करत असल्याचा युवा नेते प्रवीण खेडकर यांचा गंभीर आरोप**

पाथर्डी । प्रतिनिधी

पाथर्डी तालुक्यातील बहुचर्चित मुंगूसवाडे ग्रामपंचायत सध्या विविध राजकीय कारणाने चर्चित असल्याने दोन गटातील आरोपांच्या क्रिया प्रतिक्रिया उमटताना दिसत आहेत ग्रामपंचायत मधील कार्यरत असलेले पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ नवनाथ खेडकर यांच्यावर युवा नेते प्रवीण खेडकर यांनी गंभीर आरोप करताना म्हटले आहे की मुंगूसवाडे ग्रामपंचायत मधील पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ नवनाथ खेडकर यांची नियुक्ती निवड पद्धती पात्रता वेतन व भत्यांची अभिलेखाच्या आधारे चौकशी करण्याची मागणी केली असून गेल्या दोन महिन्यापासून गटविकास अधिकारी पंचायत समिती पाथर्डी आणि जि.प.मुख्य कार्यकारी अधिकारी अहिल्यानगर यांच्याकडे लेखी निवेदन व तक्रार दिली आहे परंतु लेखी निवेदन देऊनही चौकशी न करता अधिकारी पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ खेडकर यांना पाठीशी घालत पक्षपात करत असल्याचा गंभीर आरोप युवा नेते प्रवीण खेडकर यांनी केला आहे लेखी निवेदनामध्ये व तक्रारी मध्ये प्रवीण खेडकर यांनी पुढील मुद्दे मांडले आहेत ज्यामध्ये मुंगूसवाडे ग्रामपंचायत मध्ये कार्यरत असलेले पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ नवनाथ खेडकर यांची नियुक्तीची प्रक्रिया नियमबद्ध पारदर्शक व शासनाच्या लागू नियमानुसार झाली आहे का याबाबत गंभीर शंका उपस्थित करण्यात आली आहे सदर कर्मचाऱ्याच्या नियुक्तीच्या कालावधीत त्याचा निकटवर्तीय नातेवाईक ग्रामपंचायतमध्ये सहभागी असल्याची माहिती असल्याने सदर नियुक्तीमध्ये कोणत्या प्रकारचा राजकीय प्रभाव दबाव व नियमबाह्य हस्तक्षेप झाला आहे का याची सखोल चौकशी करण्यात यावी सदरील कर्मचाऱ्याच्या नियुक्तीच्या बेकायदेशीर व नियमबाह्य नियुक्तीमुळे तोंडी निष्कर्ष न काढता सदर नियुक्तीवेळी ग्रामपंचायत मधील ठराव पुस्तक नोंदवही मूळ अर्ज आवक जावक जाहिरात प्राप्त अर्ज पात्र अपात्र उमेदवारांची यादी निवड समितीचे इतिवृत्त निवडीचे निकष परीक्षा निवड प्रक्रिया निवडीचे आदेश वेतन निश्चिती आदेश व त्याचे ठराव व आर्थिक अभिलेख तपासण्यात यावेत सदरील कर्मचारी नियुक्ती वेळी ग्रामपंचायतचा ठराव घेतला त्याची मूळ प्रत सदर ठरव्याच्या वेळी ग्रामपंचायतची बैठक कायदेशीररित्या घेतली होती का या सर्व बाबीची निष्पक्ष चौकशी करून पाणीपुरवठा कर्मचारी रामनाथ नवनाथ खेडकर यांच्या मुंगूसवाडे ग्रामपंचायत मधील पाणीपुरवठा कर्मचारी पदाची बेकायदेशीर नियुक्ती झाल्याचा संशय असल्याने शासनाच्या पाणीपुरवठा कर्मचारी नियुक्तीच्या अटी व शर्ती व निवडीचे निकष बनावट व बेकायदेशीर तयार करून नियुक्ती देण्यात आल्याचा गंभीर आरोप प्रवीण खेडकर यांनी केला आहे पंचायत समिती पाथर्डी व मुख्य कार्यकारी अधिकारी अहिल्यानगर यांनी मागील दोन महिन्यापासून सदरील कर्मचारी निवडीच्या तक्रारी अर्जावर कुठलेही सुनावणी किंवा उत्तर न दिल्याने अधिकारी राजकीय दबावापोटी सदरील कर्मचाऱ्याला पाठीशी घालत आहेत का असा गंभीर आरोप युवा नेते प्रवीण खेडकर यांनी केला आहे.

# मुख्याध्यापकाचा मनमानी कारभार ?

**केंद्रप्रमुखाचा अतिरिक्त चार्ज ; शाळेला दांडी, विद्यार्थी वाऱ्यावर**

मंठा । प्रतिनिधी

मंठा तालुक्यातील माळतोंडी येथील जिल्हा परिषद शाळेत कार्यरत असलेल्या मुख्याध्यापक कारभारी ढाकणे यांच्या कार्यपद्धतीबाबत पालक व ग्रामस्थांकडून गंभीर प्रश्न उपस्थित केले जात आहेत. शाळेत नियमित उपस्थितीबाबत तक्रारी होत असतानाच त्यांच्याकडे केंद्रप्रमुखाचा कार्यभार सोपविण्यात आल्याने शिक्षण विभागाच्या कारभारावरही प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे.

माळतोंडी येथील जिल्हा परिषद शाळेत विद्यार्थी शिक्षण घेत असताना शिक्षकांची नियमित उपस्थिती आणि अध्यापनाची गुणवत्ता याकडे संबंधित अधिकाऱ्यांनी गांभीर्याने लक्ष देणे आवश्यक आहे. मात्र, मुख्याध्यापक श्री. ढाकणे यांच्याकडून शाळेतील उपस्थितीबाबत मनमानी केली जात असल्याचा आरोप पालक व ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे. शिक्षक वेळेवर शाळेत उपस्थित राहत नसल्यास विद्यार्थ्यांच्या शिक्षणाचे मोठे नुकसान होण्याची शक्यता आहे.

विशेष म्हणजे, संबंधित शिक्षकाकडे केंद्रप्रमुखाचा अतिरिक्त कार्यभारही असल्याची माहिती समोर येत आहे. त्यामुळे एकीकडे मूळ शाळेतील अध्यापनाची जबाबदारी आणि दुसरीकडे केंद्रप्रमुखाचा अतिरिक्त कार्यभार, आणि पत्नीच्या नावाने एलआयसीचा व्यवसाय अशा तिहेरी जबाबदारीमुळे विद्यार्थ्यांच्या नियमित शिक्षणावर परिणाम होत असल्याची चर्चा ग्रामस्थांमध्ये आहे. शासनाकडून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना दर्जेदार शिक्षण मिळावे यासाठी मोठ्या प्रमाणात निधी खर्च केला जातो. शिक्षकांचे वेतन, शैक्षणिक सुविधा आणि विविध योजनांवर शासनाचा खर्च होत असताना प्रत्यक्ष शाळेत शिक्षकांची उपस्थिती आणि विद्यार्थ्यांना नियमित अध्यापन मिळते का, याची तपासणी करणे ही शिक्षण विभागाची जबाबदारी आहे. माळतोंडी शाळेतील परिस्थितीबाबत पालकांमध्ये नाराजी निर्माण होत असून, संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष शाळेला भेट देऊन वस्तुस्थितीची पाहणी करावी, अशी मागणी होत आहे. शिक्षक गैरहजर राहत असल्याच्या तक्रारी खऱ्या असल्यास त्याची नोंद घेऊन नियमानुसार कारवाई करण्यात यावी, अशीही मागणी ग्रामस्थांकडून होत आहे. शिक्षकांच्या गैरहजेरीमुळे विद्यार्थ्यांचे शैक्षणिक नुकसान होत असल्यास त्याची जबाबदारी निश्चित होणे गरजेचे आहे. शिक्षण विभागाने केवळ कागदोपत्री कारवाई न करता प्रत्यक्ष शाळेत जाऊन परिस्थितीची पाहणी करावी. माळतोंडी येथील विद्यार्थ्यांना नियमित आणि दर्जेदार शिक्षण मिळावे, यासाठी तातडीने योग्य कार्यवाही करण्याची मागणी पालकांकडून होत आहे.

# शेतकऱ्यांना दिवाळीपूर्वी दुष्काळी अनुदान व २५ टक्के पिकविमा अग्रीम द्या -राजेश मोरे

मंठा । प्रतिनिधी

शेतकरी यंदा दुष्काळसदृश परिस्थितीमुळे मोठ्या आर्थिक संकटात सापडले असून, शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी शासनाने निर्देशित केल्याप्रमाणे दुष्काळी अनुदान व पिक विम्याची २५ टक्के अग्रीम दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करावे, अशी मागणी भाजप किसान मोर्चाचे मा. प्रदेश उपाध्यक्ष तथा प्रदेश कार्यकारिणी सदस्य राजेश मोरे यांनी जिल्हाधिकारी, जालना यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे.

या निवेदनात म्हटले आहे की, शासनाने निर्देशित केल्यानुसार शेतकऱ्यांना अद्यापही २५ टक्के पीकविमा रक्कम मिळालेली नाही. यासंदर्भात विमा कंपन्यांकडे अनेक वेळा पाठपुरावा करण्यात आला; मात्र संबंधित



कंपन्यांकडून शेतकऱ्यांच्या मागण्यांकडे सातत्याने दुर्लक्ष होत असल्याची बाब निवेदनात नमूद करण्यात आली आहे.गतवर्षिच्या पिक विम्याची रक्कम विमा कंपणी ने आद्याप दिलेली नाही

यंदा पावसाच्या अनियमिततेमुळे आणि दुष्काळी परिस्थितीमुळे शेतकऱ्यांचे मोठे आर्थिक नुकसान झाले आहे. खरीप हंगामातील पिकांचे नुकसान झाल्याने शेतकऱ्यांसमोर आर्थिक अडचणींचा डोंगर उभा राहिला आहे. अशा परिस्थितीत पीकविमा आणि दुष्काळी अनुदानाची रक्कम वेळेत मिळणे अत्यंत आवश्यक आहे. दिवाळीचा सण तोंडावर असताना शेतकऱ्यांना आर्थिक मदतीची प्रतीक्षा करावी लागत आहे. सन १९७२ नंतरचा मोठा दुष्काळ पडल्याची परिस्थिती निर्माण झाली असून, शेतकरी पूर्णतः हतबल झाले आहेत. अशा परिस्थितीत शासनाने केवळ आश्वासने न देता प्रत्यक्ष आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. त्यामुळे जिल्हा प्रशासनाने या प्रकरणात स्वतः लक्ष घालून संबंधित पीकविमा कंपन्यांना आवश्यक आदेश द्यावेत आणि दुष्काळी अनुदानाची रक्कमही दिवाळीपूर्वी शेतकऱ्यांच्या खात्यावर वर्ग करण्यासाठी तातडीने कार्यवाही करावी, अशी मागणी राजेश मोरे यांनी केली आहे. यासंदर्भात माजी मंत्री तथा आमदार बबनराव लोणीकर, किसान मोर्चा प्रदेश अध्यक्ष रामकृष्ण वेताळ आणि युवा नेते राहुल लोणीकर यांच्यामार्फत सरकारकडे पाठपुरावा करण्यात येत असून,मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस सुद्धा शेतकऱ्यांच्या बाजूने आहेत. मात्र प्रशासनाकडूण विलंब होऊ नये त्यामुळे शेतकऱ्यांना सरसकट दुष्काळी अनुदान व पिकविम्याची २५ टक्के रक्कम दिवाळीपूर्वी मिळेल असा विश्वास राजेश मोरे यांनी व्यक्त केला.

## जाहीर प्रगटन

मा. श्रीमती एस. आर. पाटील, सह दिवाणी न्यायाधीश, क. स्तर, पाटोदा, ता. पाटोदा, जि. बीड यांच्या न्यायालयात,
किरकोळ दिवाणी अर्ज ४१२/२०२६ विमल व इतर विरुध्द निरंक
मार्फत ॲड. आर. एन. सानप

अर्जदार १. विमल महादेव सानप,२. बालाजी महादेव सानप ३. केशव महादेव सानप, अमृत महादेव सानप रा.सर्व मिसाळवाडी ता.पाटोदा जि.बीड

विरुद्ध निरंक

**मागणी अर्ज:- बॉम्बे रेग्युलेशन ॲक्ट १८२७ चे कलम २ नुसार वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत..**

वरील अर्जदार यांनी या न्यायालयात मयत महादेव देवराव सानप, हे रा.मिसाळवाडी ता.पाटोदा जि. बीड यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र मिळवण्यासाठी अर्ज केला आहे.

ज्याअर्थी महादेव देवराव सानप, यांचा मृत्यु दिनांक ०४/०५/२०२२ रोजी मुकलेस हॉस्पीटल ॲण्ड रिसर्च सेंटर, अहिल्यानगर (अहमदनगर) ता. जि. अहिल्यानगर अहमदनगर येथे मयत झाले आहेत अर्जदार क्र.१ ही मयताची पत्नी असून अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. या व्यतिरिक्त मयतास कोणीही कायदेशीर वारसदार नाही.

वरील अर्जदारास शासकीय व निमशासकीय कामाकरीता व इतर कार्यालयीन उपयोगाकरीता वारस प्रमाणपत्राची आवश्यता आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस कळविण्यात येते की, सदर अर्जदार सदरहु मयताचे वारस नव्हेत अथवा त्यांच्या व्यतिरीक्त इतर कोणी मयताचे वारस आहेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर या जाहिरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत त्यांनी या कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात आणि या लेखावरून असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदर कोर्ट सदरहू अर्जदार यांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेवुन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास त्यांना सदरहू मयत महादेव देवराव सानप, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी.

आज दिनांक १२ ऑक्टोबर २०२६ रोजी माझ्या सहीने व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

सदर प्रकरणाची पुढील तारीख दि. १९ नोव्हेंबर २०२६.

स्वाक्षरित
कनिष्ठ लिपिक

आदेशावरुन,
**सहाय्यक अधिक्षक,**
दिवाणी न्यायालय क.स्तर पाटोदा
ता. पाटोदा, जि. बोड

**कार्यालय नगरपंचाय घनसावंगी जि. जालना**
**प्रशासकीय इमारत, घनसावंगी**
npghansawangigmail.com PHno02483-271787
जा.क्रं.२०२६/नपघ/जा.प्र./कावी- १०२५
दिनांक:-१३/१०/२०२६

## -: जाहीर प्रगटन

सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, अर्जदार १. आमीन कासम सय्यद २. तब्बसुम अमीन सय्यद ३. अफताफ अमीन सय्यद तिघे रा. भोगगांव ता. घनसावंगी जि. जालना यांनी नामे १. आदिल जमील शेख २. महेबुब गफुर सय्यद दोघे रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्याकडुन रजिस्टर दस्त क्रं. ३१७६ दि. ०७/१०/२०२६ या खरेदीदस्ताची सत्य प्रत जोडुन आवक क्रं. १३२४ दिनांक:- १२/१०/२०२६ रोजी नामांतर करण्यासाठी अर्ज सादर केला आहे. १. आदिल जमील शेख २. महेबुब गफुर सय्यद रा. ता. घनसावंगी जि. जालना यांच्या नावावर असलेला गट नं. (३९३) मधील प्लॉट नं. सि.स.नं. ज्याचा मिळकत क्रं. १७१०/५८ मधील क्षेत्र २२३.०४ चौ.मी नावे करणेस्तव ज्याची चतु: सिमा खालील प्रमाणे आहे.

पुर्वेस :- हनीफ अल्लाबक्ष पठाण यांची मालमत्ता
पश्चिमेस : अंतर्गत रस्ता
दक्षिणेस : सय्यद अहमद व नियाजमोहम्मद लालमोहम्मद यांची मालमत्ता
उत्तरेस :- अंतर्गत रस्ता

या वरील चतुः सिमा मधील क्षेत्र २२३.०४ चौ. मी जागा खरेदीदस्ता आधारे नामांतर करणे बाबत कोणाचेही काही उजर/ आक्षेप/तक्रार असल्यास सदर जाहीर प्रगटन प्रसिध्द झाल्यापासुन या कार्यालयात १५ दिवसाच्या आत लेखी कागदपत्राच्या पुराव्या सह आक्षेप अर्ज दाखल करावा. नसता नियमाने मुदत संपल्यावर नामांतर साठी कोणाचेही काहीही म्हणने नाही. असे समजुन नामांतर कार्यवाही पुर्ण करण्यात येईल याची कृपया नोंद घ्यावी.

करीता जाहीर प्रगटन माझ्या सहीने व कार्यालयाच्या शिक्याने दिले आहे.

**मुख्याधिकारी**
**नगर पंचायत घनसावंगी**

# पोलिसांच्या दडपशाहीच्या विरोधात खंडेश्वरी यात्रा पूर्ण बंद
# जिल्हा प्रशासनाच्या आश्वासनानंतर यात्रा सुरळीत सुरू

बीड । प्रतिनिधी

बीड शहराचे ग्रामदैवत खंडेश्वरी माता मंदिराच्या परिसरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी यात्रा भरली आहे. दरवर्षी यात्रेमध्ये कुठलाही गोंधळ होत नाही. मात्र यावर्षी पेठ बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केळे यांच्यामुळे यात्रा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. केळे यांनी सोमवारी रात्री १० नंतर सर्व यात्रा बंद करा. असा तुघलकी आदेश काढला. यात्रा बंद होत नाही असे पाहून त्यांनी व्यापाऱ्यांना मारहाणही केली. येथील विश्वस्तांनाही यात्रा बंद करण्याचा हुकूम दिला. मात्र तरीही यात्रा बंद न झाल्याने मारहाण करण्यास सुरुवात केली. या प्रकाराविरुद्ध मंदिर देवस्थान विश्वस्त मंडळ आणि व्यापाऱ्यांच्या वतीने मंगळवारी दिवसभर यात्रा बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला. जोपर्यंत पोलिसांचा निर्णय बदलत नाही तोपर्यंत यात्रा सुरू होणार नाही. असा निर्णय घेण्यात आला मात्र अप्पर जिल्हाधिकाऱ्यांच्या विनंतीनंतर आणि इथून पुढे कुठलाही प्रकार घडणार नाही याचे ठोस आश्वासन मिळाल्यानंतर यात्रा पुन्हा सुरळीत सुरू झाली.

बीडच्या ग्रामदैवत खंडेश्वरी मंदिरा परिसरात दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दूर दूर वरून व्यापारी रहाटपाळणे वाले मोठ्या संख्येने या ठिकाणी आले होते. गोरगरीब व्यापारी आपल्या उपजिविकेसाठी या ठिकाणी खाद्यपदार्थाची दुकाने, खेळण्याची दुकाने, विविध खेळाचे प्रकार दाखवण्याची दुकाने, फुले आणि प्रसादाची दुकाने थाटतात. दरवर्षी ही यात्रा व्यवस्थितपणे आणि सुरळीत पार पडते. मात्र यावर्षी पोलिसांच्या पेठ बीड पोलिसांच्या कृपेने यात्रेमध्ये विघ्न निर्माण झाले. सोमवारी रात्री बीड पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक केळे यांनी यात्रा १० नंतर बंद करा असे आदेश काढले आणि यात्रा बंद होत नाही म्हणून व्यापाऱ्यांना मारहाणही केली. विश्वस्तांना ही आरेरावीची भाषा केली. या अन्यायाच्या निषेधार्थ मंगळवारी दिवसभर सर्व व्यापारी दुकाने बंद ठेवण्यात आली. जोपर्यंत

### पोलीस मोबाईल चोरांकडून पैसे खातात

यावेळी यात्रा बंदचे आंदोलन सुरू होते. त्यावेळी या ठिकाणी छोटे मोठे व्यापार करणाऱ्या महिला संतप्त झाल्या होत्या. आम्ही गरीब लोक आहोत व्याजाने पैसे घेऊन व्यवसाय करतो. मात्र पोलीस गोरगरिबांवर दडपशाही करतात आणि या ठिकाणी जे मोबाईल चोर चोरी करतात त्यांच्याकडून हे लोक पैसे खातात. असा गंभीर आरोप यातील एका महिला व्यापाऱ्याने केला.



### अप्पर साहेबांच्या आश्वासनानंतर यात्रा सुरु

पोलिसांच्या दडपशाही विरुद्ध पालकमंत्री यांच्या सह खासदार, आमदारांना कळविण्यात आले. याशिवाय जिल्हाधिकारी आणि पोलीस अधीक्षकांनाही कळवण्यात आले. जोपर्यंत पोलिसांचा निर्णय बदलत नाही तोपर्यंत यात्रा सुरू करणार नाही असा आम्ही निर्णय घेतला. मात्र अप्पर जिल्हाधिकारी यांनी यापुढे यात्रेला कोणीही अडथळा निर्माण होणार नाही. असे ठोस आश्वासन दिल्यानंतरच आम्ही यात्रा सुरळीत सुरू केली.

राणा रणजितसिंह चौहाण
मुख्य विश्वस्त, खंडेश्वरी देवस्थान बीड



# कर्जमाफीच्या तिसऱ्या यादीत आष्टी तालुक्यातील ५ हजार ६०६ शेतकरी पात्र

**१४७ गावांतील शेतकऱ्यांना दिलासा; केवायसी व फार्मर आयडीतील त्रुटी मोबाईलवरून दुरुस्त करण्याचे आवाहन– सहायक निबंधक पूजा सांगळे**

आष्टी । प्रतिनिधी

राज्य शासनाने जाहीर केलेल्या कर्जमाफीच्या तिसऱ्या यादीत आष्टी तालुक्यातील १४७ गावांमधील ५ हजार ६०६ शेतकरी पात्र ठरले आहेत. त्यामुळे कर्जमाफीच्या लाभाच्या प्रतीक्षेत असलेल्या शेतकऱ्यांना दिलासा मिळाला आहे. दरम्यान, केवायसी (घधउ), फार्मर आयडी तसेच तांत्रिक त्रुटींमुळे ज्या शेतकऱ्यांचे अर्ज प्रलंबित आहेत, त्यांनी आवश्यक प्रक्रिया पूर्ण करून घ्यावी, असे आवाहन आष्टीच्या सहायक निबंधक पूजा सांगळे यांनी केले आहे.

आष्टी तालुक्यात कर्जमाफी योजनेअंतर्गत शेतकऱ्यांना लाभ मिळण्यास सुरुवात झाली आहे. तालुक्यातील एकूण १२ हजार ६४१ शेतकरी कर्जमाफीसाठी पात्र ठरले होते. त्यानंतर आता जाहीर झालेल्या तिसऱ्या यादीत १४७ गावांतील ५ हजार ६०६ शेतकऱ्यांचा समावेश झाला आहे. त्यामुळे पात्र शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण असून, उर्वरित शेतकऱ्यांचेही लक्ष पुढील कार्यवाहीकडे लागले आहे.कर्जमाफीच्या लाभापासून वंचित राहू नये, यासाठी शेतकऱ्यांनी आपल्या अर्जाची सद्यस्थिति तपासावी आणि केवायसी किंवा फार्मर आयडीमधील त्रुटी वेळेत दूर कराव्यात, असे आवाहन सहायक निबंधक पूजा सांगळे यांनी केले आहे.

**मोबाईलवरूनही करता येणार प्रक्रिया**

शेतकऱ्यांना आधार क्रमांक, मोबाईल क्रमांक आणि फार्मर आयडी यांचे लिंकिंग

### केवायसी आणि फार्मर आयडीतील त्रुटी दूर करा

काही शेतकऱ्यांचे अर्ज केवायसी पूर्ण नसणे, फार्मर आयडीमधील त्रुटी किंवा आधार क्रमांक व मोबाईल क्रमांकाच्या लिंकिंगमधील अडचणींमुळे प्रलंबित आहेत. अशा शेतकऱ्यांनी आपली माहिती तपासून आवश्यक दुरुस्ती करून घ्यावी. केवायसी आणि फार्मर आयडीशी संबंधित प्रक्रिया पूर्ण केल्यास संबंधित माहिती प्रणालीमध्ये अद्ययावत होण्यास मदत होईल.

# खंडेश्वरी यात्रेचा भक्तिमय वातावरणात शुभारंभ
## अग्रवाल कुटुंब यांच्या हस्ते घटस्थापना

बीड । प्रतिनिधी

बीड शहरापासून जवळच असलेले बीडचे ग्रामदैवत खंडेश्वरी देवी मंदिरात रविवारी दुपारी ११:३० वाजता गोपी शेठ अग्रवाल आणि त्यांच्या कुटुंबासमवेत विधिवत पूजा करून घटस्थापना करण्यात आली. या ठिकाणी संपूर्ण दहा दिवस मोठी यात्रा भरते .या यात्रेच्या नियोजनासाठी खंडेश्वरी माता मंदिराचे विश्वस्त राणा रणजितसिंह चौहान, सुरेश बनसोडे ,राजेंद्र बनसोडे सम्राट चौहान ,विकी चौहाण, राजू लोळगे , विकास गाडेकर तसेच मंदिराचे पुजारी अंबादास गुरव, युवराज गुरव, बंडू खनाळ आदी सतर्क असतात. संपूर्ण महाराष्ट्रातून या ठिकाणी रहाट पाळणे वाले, खेळणी वाले, विविध मिठाईची दुकाने, खाद्यपदार्थाची दुकाने, गृह उपयोगी वस्तूंची दुकाने मोठ्या प्रमाणात थाटलेली असतात. याचे संपूर्ण नियोजन विश्वस्त करतात. देवीची सकाळी चार वाजता काकड आरती होते. दुपारी बारा वाजता मध्यान भोजन तर सायंकाळी ७:३० वाजता मंदिर परिसरात देवीचा छबिना निघतो मिरवणुकीनंतर आठ तीस वाजता खंडेश्वरी मातेची आरती होते. या ठिकाणी सकाळी सहा ते रात्री अकरा वाजेपर्यंत भाविक दर्शनासाठी गर्दी करतात. यावर्षी मोठ्या उत्साहात या यात्रेचा शुभारंभ झाला आहे .या ठिकाणी चोख पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे.





पिंपळवंडी:–अंमळनेर श्री रेणुकामाता महिला सप्ताह ह.भ.प.ज्ञानेश्वरी महाराज जगताप यांनी हरिकिर्तन प्रसंगी संत तुकोबारायांच्या अभंगातुन सांगितले की,मनाची स्वच्छता, हृदयाची विशालता,प्रयत्नांची पराकाष्टा,सहकाराला बळ व जागतिकीकरणाचे दिव्य स्वप्न पाहणाऱ्या माणसाला परमेश्वर रूप प्राप्त होते.यावेळी ह.भ.प.महादेवानंदभारती महाराज भाविका भगत आसाराम साबळे व गांवकरी.

# गर्दीत चोरी गेलेली दीड तोळ्याची सोनसाखळी फिर्यादीकडे सुपुर्द!
## बीड ग्रामीण पोलिसांच्या प्रयत्नांना यश ; ग्रामस्थांनी केला सत्कार

बीड । प्रतिनिधी

मराठा आरक्षणाच्या मागणीसाठी मनोज जरांगे पाटील मुंबईकडे जात असताना रामनगर–जिरेवाडी ग्रामस्थांच्यावतीने महालक्ष्मी चौक येथे आयोजित सत्कार सोहळ्यात गर्दीचा फायदा घेत चोरट्याने रामभाऊ मोहिते यांच्या गळ्यातील दीड तोळ्याची सोनसाखळी लंपास केली होती. मात्र, बीड ग्रामीण पोलिसांनी तपासाची चक्रे फिरवत चोरीला गेलेली सोनसाखळी शोधून काढली. पोलिसांच्या या उल्लेखनीय कामगिरीबद्दल ग्रामस्थांच्यावतीने पोलीस हवालदार प्रसाद कदम, विजय जाधव यांच्यासह वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांचा सत्कार करून कृतज्ञता व्यक्त करण्यात आली.

रामभाऊ अश्रुबा मोहिते (रा. जिरेवाडी ता. जि.बीड) यांची सत्काराच्या गर्दीत सोन्याची साखळी चोरी गेली. चोरी गेलेली साखळी पुन्हा मिळण्याची आशा जवळपास मावळली होती. तरीही पोलिसांत तक्रार दाखल करण्याचा निर्णय घेण्यात आला.



बीड ग्रामीण पोलीस ठाण्यात तक्रार दिल्यानंतर पोलीस हवालदार प्रसाद कदम यांनी तपासासाठी प्रयत्न करण्याची ग्वाही देत धीर दिला. तसेच सोहळ्यातील फोटो आणि व्हिडिओ उपलब्ध करून देण्याची विनंती केली. उपलब्ध फोटो व व्हिडिओंच्या आधारे पोलिसांनी तपासाला गती दिली. या

### पोलीस हवालदार प्रसाद कदम, विजय जाधव यांचे मानले आभार

या कामगिरीबद्दल पोलीस हवालदार प्रसाद कदम, विजय जाधव, बीड ग्रामीण पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक सोमनाथ जाधव, सहायक पोलीस निरीक्षक देवीदास सोनवळे आणि पोलीस उपनिरीक्षक संकेत घुगे यांचा ग्रामस्थांच्या वतीने सत्कार करण्यात आला. यावेळी पत्रकार केशव कदम, सरपंच सर्जेराव मोहिते, अशोक सुरवसे, निलेश मोहिते, कृष्णा मोहिते, तुळशीदास महाराज शिंदे आदी उपस्थित होते.

# ग्राहकांनी भगर पीठ खरेदी करताना आणि त्याचे सेवन करताना खबरदारी घ्यावी

**बीड । प्रतिनिधी**

शारदीय नवरात्र महोत्सव २०२६ दि. १२ ते २५ ऑक्टोबर २०२६ या कालावधीत अत्यंत उत्साहात संपन्न होत आहे. नवरात्रीच्या या नऊ दिवसात अनेक भाविक उपवास करतात आणि उपवासासाठी प्रामुख्याने भगर किंवा भगरीच्या पिठाचा वापर केला जातो. मात्र सणासुदीच्या काळात भेसळयुक्त किंवा दूषित अन्नामुळे नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होऊ नये, यासाठी अन्न व औषध प्रशासनाने ग्राहकांसाठी विशेष नियमावली जारी केली आहे. तरी बीड जिल्ह्यातील ग्राहकांनी भगर पीठ खरेदी करताना आणि त्याचे सेवन करताना खबरदारी घ्यावी, असे आवाहन अन्न व औषध प्रशासन विभागाने प्रसिध्दीपत्रकाद्वारे केले आहे.

भगर, भगरीचे पीठ किंवा इतर कोणतेही अन्नपदार्थ खरेदी करताना ते केवळ परवानाधारक किंवा नोंदणीधारक अन्न व्यवसायिकाकडूनच खरेदी करावे. खरेदी केल्यानंतर त्याचे पक्के खरेदी बिल आवर्जून घ्यावे. बाजारातून किंवा हातगाड्यावरून उघडे, सुटे भगर पीठ किंवा उपवासाचे पीठ खरेदी करू नये. तसेच हे पीठ जास्त दिवस साठवून वापरू नये. नेहमी पॅकबंद भगर किंवा त्याचे पीठ खरेदी करावे. पॅकेट खरेदी करताना त्यावर उत्पादकाचे नाव, पत्ता, बॅच नंबर, उत्पादन दिनांक आणि वापराची अंतिम तारीख तपासूनच खरेदी करावी. बाजारातून पॅकबंद अखंड भगर खरेदी केल्यानंतर ती व्यवस्थित स्वच्छ करावी. त्यानंतर घरगुती पद्धतीने स्वतः घरीच तिचे पीठ तयार करून सेवन करणे अधिक सुरक्षित ठरेल. आवश्यकतेनुसारच भगर तयार करून त्याचे सेवन करावे. शिळी भगर खाणे टाळावे. भगर साठवताना ती स्वच्छ, कोरड्या वातावरणात आणि हवाबंद डब्यात ठेवावी. भगर बनवताना पूर्णपणे स्वच्छ वातावरणात आणि पिण्याच्या शुद्ध पाण्याचा वापर करावा. तसेच, भगर पिठापासून तयार केलेली भाकरी व्यवस्थित व परिपूर्ण भाजलेली असल्याची खात्री करूनच ती खावी. नागरिकांनी स्वच्छ आणि सुरक्षित अन्नपदार्थ सेवन करावेत, तसेच आरोग्याची काळजी घेत प्रशासनाला सहकार्य करावे, असेही प्रसिध्दीपत्रकाद्वारे कळविले आहे.

# श्रमदान व वृक्षसंवर्धनातुन गाव आदर्श होईल–मोरे

पिंपळवंडी । प्रतिनिधी

काकडहिरा ता.पाटोदा येथे वॉटरशेड ऑर्गनायझेशन ट्रस्टचे सहसंस्थापक व अध्यक्ष हर्मन बाखरबाबा यांच्या जयंतीनिमित्त श्रमदान दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.श्रमदान शिबिरात पाटोदा नायब तहसीलदार मोरे यांनी सहभाग घेतला.यावेळी मोरे यांनी सांगितले की,प्रत्येक गावात जलसंधारण कामातून रस्तानाली बांधबंधिस्ती, पाझरतलाव,दगडी बांधकामे झाली तर पाणी साठवले जाईल.चांगल्या पाऊस काळानंतर उपलब्ध विहीर बोअर व तलावाचे पाणी ठिबक व



तुषार सिंचनाने वापरले तर पाणी बचत होईल.वड,उंबर,पिंपळ या वृक्षांचे संवर्धन केले पाहिजे तर लवकर पाऊस पडेल.सध्या भयानक दुष्काळ आहे शेतकऱ्यांनी पाण्याची नासाडी करू नये.ग्राम स्वच्छतेसोबत युवक व महिलांनी श्रमदानातून शेततळे, जलतारा प्रकल्प राबवून जलसंधारण करावे.श्रमदान व वृक्षसंवर्धनातुन गावात पक्के रस्ते निर्माण होतात व शासनावर अवलंबून न राहता श्रमदानातून सुविधांची कामे होतात.स्वच्छता समृद्धी व सर्व सुविधा मिळूनआदर्श गाव निर्माण होईल असे सांगितले.यावेळी लहान सलग समतल चर खोदण्याचे काम करण्यात आले.१३ व्यक्तींच्या १३ गटांमध्ये

# आ. धस यांची नानाचीवाडी येथे सांत्वन भेट; पाटेकर कुटुंबीयांचे केले सांत्वन

आष्टी । प्रतिनिधी

ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांच्या निधनाने मराठी आणि हिंदी चित्रपटसृष्टीची मोठी हानी झाली आहे. आपल्या दमदार अभिनयाने, स्पष्टवक्तेपणाने आणि सामाजिक कार्यातून रसिकांच्या मनात विशेष स्थान निर्माण करणाऱ्या नाना पाटेकर यांना आ. सुरेश धस यांनी भावपूर्ण श्रद्धांजली अर्पण केली.

आ.सुरेश धस यांनी पुणे जिल्ह्यातील डोणजे येथील नानाची वाडी या निवासस्थानी भेट देऊन



नाना पाटेकर यांच्या प्रतिमेस पुष्प अर्पण करत त्यांना आदरांजली वाहिली. यावेळी त्यांनी नाना पाटेकर यांचे पुत्र मल्हार पाटेकर यांची भेट घेऊन पाटेकर कुटुंबीयांचे सांत्वन केले.

नाना पाटेकर यांनी आपल्या अभिनयाच्या माध्यमातून मराठी

# शिक्षणाधिकाऱ्याच्या अपडाऊनमुळे शिक्षण विभागाचा तमाशा?

**मंठा । प्रतिनिधी**

जिल्हाधिकारी पोलीस अधीक्षक तहसीलदार गटविकास अधिकारी मुख्याधिकारी निवासस्थानी राहतात मग शिक्षण अधिकारी मंठा यांना वेगळा नियम आहे का शिक्षण अधिकाऱ्याला एलर्जी झाली का याची तपासणी करणे गरजेचे आहे. याप्रकरणी जिल्हा परिषदचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी लक्ष देऊन शिक्षण अधिकाऱ्यांवर कारवाई करा अशी मागणी होत आहे. मंठा येथील

गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण होत असून त्यांचे छत्रपती संभाजीनगर येथून अपडाऊन सुरू असल्याने मंठा तालुक्यातील शिक्षण विभागाचा बट्ट्याबोळ झाला आहे.

गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांच्यावर शाळा तपासणीच्या नावाखाली खासगी शाळांकडून वसुली होत असल्याचा आरोप करण्यात येत आहे. आस्थापनेतील शिक्षक कर्मचारी श्री आंबटकर यांना सोबत घेऊन शाळांची तपासणी करण्यात येत असून केंद्रप्रमुखांना डावलले जात असल्याची चर्चा सुरू आहे.

### शिक्षक वर्ग वैतागला

मंठा तालुक्यातील प्राथमिक शिक्षण विभागाच्या कारभाराबाबत सध्या विविध प्रश्न उपस्थित होत असून, गटशिक्षणाधिकारी दत्तात्रय क्षीरसागर यांच्या कार्यपद्धतीची चौकशी करण्याची मागणी करण्यात येत आहे. छत्रपती संभाजीनगर येथून मंठा येथे ये–जा करणारे गटशिक्षणाधिकारी श्री क्षीरसागर यांनी शाळा तपासणीसाठी आस्थापनेतील कर्मचाऱ्याला सोबत घेण्याची पद्धत सुरू केली असून शिक्षण विभागाची जाण असणाऱ्या जबाबदार केंद्रप्रमुखांना तपासणी प्रक्रियेत डावलले जात असल्याच्या चर्चेमुळे शिक्षण विभागाच्या कामकाजावर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. आस्थापनेतील शिक्षक श्री आंबटकर यांची केहाळ वडगाव येथे शिक्षक म्हणून नियुक्ती असताना केवळ संभाजीनगरवरून मंठा येथे येण्यासाठी आंबटकर यांच्या वाहनाची सोय होत असल्यामुळे त्यांची आस्थापनेतील कर्मचारी म्हणून नियुक्ती करण्यात आली आहे. तालुक्यातील खासगी शाळांच्या तपासणीच्या नावाखाली आर्थिक वसुली होत असल्याची चर्चा आहे. केंद्रप्रमुखांना डावलून तपासणी कशासाठी ? असा प्रश्न उपस्थित केला जात असून शाळांच्या शैक्षणिक कामकाजाची माहिती, स्थानिक परिस्थिती आणि शाळांमधील अडचणी यांची जाण केंद्रप्रमुखांना असते. अशा परिस्थितीत शाळा तपासणीदरम्यान केंद्रप्रमुखांना डावलून आस्थापनेतील कर्मचाऱ्याला सोबत घेऊन शाळांची तपासणी करण्यात येत असल्याबाबत संशय निर्माण होत आहे. मंठा तालुक्यातील शिक्षण विभागाचा कारभार पारदर्शक आणि नियमानुसार चालणे आवश्यक आहे. त्यामुळे गटशिक्षणाधिकारी यांच्या मुख्यालयातील उपस्थितीच्या नोंदी, दौरा नोंदवही, शाळा तपासणीचे आदेश, तपासणी अहवाल यासंबंधी जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी चौकशी करावी अशी मागणी होत आहे.

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड–४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक–सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक – सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल – rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26